शनिवार, २७ जानेवारी २०२४
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १६२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 27 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-162 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05



**आधुनिक केसरी यू-ट्यूब चॅनेलचा चेहरा आणि मार्केटमधील मोहरा बनण्याची संधी**

**पाहिजेत**

**निवेदक**
२ - पुरुष २ - स्त्री
पात्रता : मराठी भाषेवर प्रभुत्व
सोशल मीडिया, मनोरंजन, राजकारण, समाजकारणाची उत्तम जाण, लिखाण व विश्लेषण करण्याची क्षमता

**मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह :**
२ - पुरुष २ - स्त्री
पात्रता : माध्यमातील मार्केटिंगचा अनुभव
क्लाएंट हाताळणीचा उत्तम अनुभव
वृत्तपत्र व डिजिटल मार्केटिंगचे ज्ञान

वरील पदांकरिता अनुभवी तसेच नवीन उमेदवारांचाही विचार केला जाईल. उमेदवारांनी आपला रिझ्युम
aadhunikkesari@gmail.com
या इमेल आयडीवर पाठवावा.

# आझाद मैदानात येणारच

## मनोज जरांगे पाटील : आरक्षण मिळाले तर गुलाल उधळणार नाही तर उपोषण

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई : मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणासाठी पदयात्रेसाठी निघाले आहेत. ही पदयात्रा वाशीत आली आहे. वाशीमध्ये शुक्रवारी मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासंदर्भात भाषण केले. तसंच महत्त्वाचे मुद्दे मांडत सरकारच्या प्रयत्नांवर भाष्यही केले. इतकेच नाही तर आज आपण वाशीतच थांबतो आहोत मात्र उद्या दुपारी १२ पर्यंत अध्यादेश मिळाला नाही तर मात्र आझाद मैदानात येणार. काहीही झाले तरीही आझाद मैदानात येणार, आरक्षण मिळाले तर गुलाल उधळायला नाही मिळाले तर उपोषण करायला. त्यासाठी उद्या दुपारी १२ पर्यंत वाट पाहणार असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत.**

मनोज जरांगे पुढे म्हणाले की, शासनाच्यावतीने आपल्या मुद्द्यावर चर्चा झाली. शासनाला आपण मागण्या केल्या होत्या. त्यासाठी आपण मुंबईला आलो आहोत. सरकारबरोबर चर्चा झाली. मंत्री कुणीही आले नव्हते. सचिव भांगे हे चर्चेचा सारासार निर्णय घेऊन आले होते. त्यांचे काय काय निर्णय आहेत, याबाबत आपल्याला सांगितले. आमच्याकडूनही ते अर्धवट वाचण्यात आले होते. सरकारने त्यांची भूमिका सांगितली. आपली भूमिका तुमच्यासमोर सांगतो. ५४ लाख नोंदी मराठ्यांच्या (कुणबी) सापडल्या आहेत. त्याची प्रमाणपत्रे तुम्ही वाटप करा. ज्या ५४ लाख नोंदी सापडल्या. नोंद नेमकी कुणाची हे माहिती करायची असेल. तर त्या ग्रामपंचायला मिळालेले कागद चिटकावयाला हवे. तरच नोंद सापडली का नाही हे कळू शकणार आहे. तरच ती व्यक्ती प्रमाणपत्रासाठी अर्ज करेल. काही जणांनी अर्ज केले नाहीत, असे सांगितले. पण नोंद मिळालेली माहितच नाही, तर तो अर्ज कसा करेल. त्यामुळे तुम्ही ग्रामपंचायतमध्ये तुम्ही नोंदीची कागदे चिटकवा अन् शिबिरे घ्या. एका कुटुंबातली एक नोंद मिळाली असेल तर कुटुंबातल्या सगळ्यांना प्रमाणपत्र दिले गेले पाहिजे. नोंदी मिळाल्या आहेत. ज्या नोंदी मिळालेल्या सर्व परिवारालाही त्याच नोंदीच्या आधारावर प्रमाणपत्र द्यावे. जसी की एक नोंद मिळाली तर काही जणांना एका नोंदीवर अनेकांना लाभ मिळाला. एका नोंदीवर पाच जणांना सरासरी फायदा झाला तर दोन कोटी मराठा समाज आरक्षणात जातो. हे दोन मुद्दे स्पष्ट झाले. ५४ लाख नोंदी मिळाल्यात तर त्यांना प्रमाणपत्र वितिरित करा. वंशावळ जोडायला, काही कालावधी लागतो. त्यासाठी समिती गठित केल्याचे शासन निर्णयात सांगितले.

**सुप्रीम कोर्टात आरक्षण मिळेपर्यंत १०० टक्के मोफत शिक्षण** : क्यूरीटिव्ह पीटीशन विषय सुप्रीम कोर्टात आहे . ते आरक्षण मिळेपर्यंत मराठा समाजातील मुलांना १०० टक्के मोफत शिक्षण द्यावे . ते आरक्षण मिळेपर्यंत ज्या सरकारी भरत्या होणार आहेत त्या आरक्षण मिळेपर्यंत करायच्या नाहीत आणि जर भरती करायची असेल तर आमच्या जागा राखीव ठेवायच्या .

## राजपथावर राम मंदिर चित्ररथाने वेधले लक्ष...



देशाच्या 75 व्या प्रजासत्ताकदिनानिमित्त दिल्लीतील राजपथावर विविध संस्कृतीचे, राज्याचे दर्शन घडले. यामध्ये मुख्य आकर्षण ठरले ते उत्तर प्रदेशातील अयोध्या राम मंदिर.

### चर्चेतली बातमी

## नितीश कुमार यांचा यू-टर्न

आधुनिक केसरी न्यूज

**पटना :** जनता दल (संयुक्त) अर्थात जदयूचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार हे महागठबंधनमधून बाहेर पडणार असल्याची शक्यता गेल्या दोन दिवसांपासून वर्तविण्यात येत आहे. नितीश कुमार यांनी लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाशी आघाडी करत सरकार स्थापन केले होते. मात्र आता ते पुन्हा एकदा या आघाडीतून बाहेर पडून भाजपाशी हातमिळवणी करणार आहेत. येत्या रविवारी, २८ जानेवारी रोजी त्यांचा भाजपाबरोबर शपथविधी होईल, अशी बातमी राजकीय सूत्रांनी दिली आहे. नितीश कुमार मुख्यमंत्री तर सुशीलकुमार मोदी हे उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. सुशीलकुमार मोदी यांनी या राजकीय घडामोडीबाबत बोलताना सांगितले की, बंद झालेले दरवाजे पुन्हा उघडले जाऊ शकतात. राजकारण हा शक्यतांचा खेळ आहे, असेही ते म्हणाले. महागठबंधनमधील जनता दल (संयुक्त) आणि राष्ट्रीय जनता दल यांच्यात गेल्या काही काळापासून सूप्त संघर्ष सुरू असल्यामुळे नितीश कुमार पुन्हा एकदा भाजपाच्या वाटेवर असल्याचे सांगितले जाते. अनेक काळापासून सूप्तावस्थेत असलेला हा संघर्ष आता शिगेला पोहोचला आहे.

# पळशी झाशी ग्रामस्थांनी राज्य मागासवर्ग आयोगाच्या पत्राची केली होळी

आधुनिक केसरी न्यूज


सचिन खंडारे

बुलढाणा : २४ जानेवारीच्या महाराष्ट्र शासनाच्या पत्रामध्ये बौध्द धर्माचा उल्लेख नसुन महार जातीची नोंद करावी, असा उल्लेख आहे. यापुढेही संभ्रम व भीती निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र शासन अजुनही काही पत्र काढू शकते. महार जातीचा त्याग करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो लोकांना बौद्ध धम्माची दिक्षा दिली व पुर्वाश्रमीचे महार बौध्द झाले व इतर समुहातील लोकसुध्दा मोठ्या प्रमाणात बौध्द धम्म स्विकारत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या या पत्रामुळे व सर्वेक्षण करणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळे महाराष्ट्रातील बौध्दांमध्ये संभ्रम, भीती व दुही निर्माण करण्याचे काम महाराष्ट्र शासन करत आहे.

या पत्राच्या निषेधार्थ वामन मेश्राम (राष्ट्रीय अध्यक्ष भारत मुक्ती मोर्चा) यांनी या पत्राची होळी करण्याचे व महार जातीचा उल्लेख न करण्याचे आवाहन महाराष्ट्रातील बौध्दांना केले आहे. पळशी झाशी गावातील भारत मुक्ति मोर्चाचे सुजित बांगर, बाळू बांगर, दादाराव बांगर, कडू बांगर, गुणवंत बांगर, कैलास बाजोडे, राजू बांगर, सिद्धांत बांगर, रवी बांगर, विशाल भारसाकडे, ग्रामपंचायत सदस्या वर्षाताई बांगर, उषा डांबरे, विजयाबाई बांगर, रेखा हेरोडे, सविता बांगर, पद्माबाई भारसाकडे, यशोदा बांगर, रेखाबाई जाधव कांताबाई बांगर, रमाबाई बांगर, करुणाबाई वानखडे, गोकुळाबई बांगर, प्रतिभाबाई डांबरे यावेळी अशा बहुसंख्य महिला यांनी पत्रकाची होळी केली.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932





# निसर्गरम्य श्रीक्षेत्र बदामी

आधुनिक केसरी

गेल्या महिन्यात म्हणजे डिसेंबर २०२३ मध्ये मला श्रीक्षेत्र बदामीला जाण्याचा योग आला. बदामी येथील श्री शाकंभरी देवी आमची कुलदेवता असल्याने यापूर्वीही अनेक वेळा या ठिकाणी जाण्याचा आणि दर्शनाचा योग आला होता. पण यावेळची अनुभूती काही औरच होती. मातेचे मंदिर खूपच सुंदर सजवले होते. सगळीकडे स्वच्छता होती आणि अतिशय प्रसन्न वातावरण होते. बदामी येथे एक दिवस मुक्काम केला आणि तेवढ्या वेळात देवीच्या त्रिवार दर्शनाचा योग आला. गाभाऱ्यात उभे राहून अतिशय जवळून दर्शन झाले. नंतर समोरील सभामंडपात बसून देवीचे निवांत दर्शन घेतले. सुदैवाने भाविकांची फारशी गर्दी नसल्याने देवीचे दर्शन खूपच शांत आणि निवांतपणे घेता आले.

पूर्वीच्या विजापूर आणि आताच्या बागलकोट जिल्ह्यात हे निसर्गरम्य आणि पवित्र ठिकाण आहे. हुबळी रेल्वेस्टेशन पासून फक्त आठ किमीच्या अंतरावर हे ठिकाण आहे. सोलापूर-गदग रेल्वे मार्गावर बदामी स्टेशन आहे. या स्टेशनवर फारसा गजबजाट किंवा गोंगाट नसतो. इथून देवीच्या मंदिराकडे जाण्यासाठी अनेक प्रकारच्या वाहनांची सोय आहे. बदामी हे तालुक्याचे ठिकाण असून येथील बाजारपेठ मोठी आहे. भाविकांच्या सोयीसाठी अनेक हॉटेल्स, लॉजेस उपलब्ध आहेत. बऱ्याचशा हॉटेलमध्ये यात्रेकरूंना अत्यंत कमी दरात जेवण, नाश्ता मिळू शकतो. अन्य जीवनोपयोगी वस्तूंच्या किमतीही बऱ्यापैकी कमी आहेत. बदामी येथील शाकंभरी देवीचं हे मंदिर अतिशय पुरातन आहे. याची दगडी बांधणी पाहताक्षणीच नजरेत भरते. या मंदिराचा अनेकदा जीर्णोद्धार करण्यात आल्याचे सांगितले जाते. शके ६०३ ( इ.स. ६८१ ) मध्ये या मंदिराचा पहिला जीर्णोद्धार करण्यात आला असावा असा अंदाज केला जातो.



## आनंदी पहाट

# आरोग्य अमुल्य संपत्ती असल्याने ती जपावी

आधुनिक केसरी

आपले सुधृढ आयुष्य म्हणजे जीवनाच्या काही मूलभूत भागांमध्ये संतुलन राखणे होय. आरोग्य ही बाब या पैलूंपैकी एक आहे. आपण आरोग्याला त्याच प्रकारे महत्त्व देतो, ज्याप्रमाणे आपण वेळ गमावल्यानंतर त्याचे महत्त्व देतो. आपण गेलेली वेळ परत आणू शकत नाही, परंतु आपण थोडे प्रयत्न करून आरोग्य परत मिळवू शकतो. चांगली शारीरिक आणि मानसिक व्यक्तीचे आरोग्य हे जगासाठी कौतुकाचा विषय ठरू शकते आणि जीवनातील समस्या सहजपणे तसेच आरामाने ते आरोग्यच सोडवू शकते. आरोग्य ही पैसा किंवा भौतिक संपत्तीच्या मालकीपेक्षा एक अमूल्य संपत्ती आहे. आपली तब्येत चांगली नसेल, तर पैसे असण्यात काही अर्थ नाही. निरोगी जीवन जगण्यासाठी, जीवनशैलीत काही बदल करणे आवश्यक असते. यामध्ये अनेक प्रकाराच्या सुधारणांचा समावेश असू शकतो. आपल्या खाण्याच्या सवयी, झोपण्याची दिनचर्या आणि जीवनशैलीत बदल ह्या बाबींचा गांभीर्याने विचार करावा लागत असतो. आपल्या शारीरिक आरोग्यासाठी आपण संतुलित, पौष्टिक आहार घ्यावा याशिवाय, ते लठ्ठपणा टाळेल आणि अतिरिक्त चरबी जाळून टाकण्यास मदत करेल अशाच अन्नाचे सेवन करावे. संतुलित आहाराला खूप महत्त्व आहे. जेव्हा आपण योग्य प्रमाणात सेवन करतो तेव्हा पोषण, जीवनसत्त्वे, प्रथिने, कॅलरी आणि बरेच काही, आपली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होण्यास मदत करतात. त्यामुळे रोगांशी लढण्यास मदत होऊन रोगमुक्त जीवन मिळू शकते. जर आपल्याला निरोगी जीवनशैली अनुभवायची असेल, तर आपल्याला जीवनात नक्कीच काही बदल करावे लागतील. निरोगी जीवनशैली राखण्यासाठी सातत्यपूर्ण सवयी आणि शिस्तबद्ध जीवन आवश्यक आहे. आपण चांगल्या सवयी अंगिकारू शकतो, जसे की नियमित व्यायाम करणे; ज्यामुळे आपली शारीरिक तंदुरुस्ती कायम राहून मानसिक संतुलन टिकून राहते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## पंच योगी लीन | आत्मरूप ||

गंध चंदनाचा | सांगे ध्यानयोग ||
विष्णु प्रिय जग | आनंदले ||१||
तुळशीचा गंध | प्रिय पांडुरंगा ||
सांगे चंद्रभागा | भक्तीयोग ||२||
झेंडुच्या उदरी | गोरक्षाचा वास ||
निरंजनी ध्यास | समाधीयोग ||३||
बकुळीच्या खाली | कृष्ण विसावला ||
जन्म धन्य केला | कर्मयोग ||४||
अंतरी मोगरा | आता गंधाळला ||
संजीवन झाला | ज्ञानयोग ||५||
पंच गंधी दास | झाला पंचप्राण ||
पंचयोगी लीन | आत्मरूप ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

शक्ती पायांची राहिली । बैसवेना मुरुकुंडी घाली ।
बृहती वाजों लागली । तोंडाच ऐसी ॥४१॥
क्षुधा लागतां आवरेना । अन्न समईं मिळेना ।
मिळालें तरी चावेना । दांत गेले ॥४२॥
पित्तें जिरेना अन्न । भक्षीतांच होये वमन ।
तैशेंचि जाये निघोन । अपानद्वारें ॥४३॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

शिष्य भाव जबले नहीं,
तबले न दीजे ज्ञान ।
षोड़स विधि गुरु कहँ पुजै, सेव्य
शिक्षा कल्याण ।।०८।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/०८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : जोवर शिष्यात शिष्य-भाव येत नाही तोपर्यंत त्यास ब्रह्मविद्येचा उपदेश देऊ नये. जो जिज्ञासू षोडशोपचाराने गुरूंची सेवा आणि पूजा करेल त्यालाच योगाचा उपदेश करणे कल्याणप्रद ठरते. म्हणून ब्रह्मविद्येच्या उपदेशासाठी अधिकारी असणे आवश्यक आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## निसंदेहनिरूपण

आधुनिक केसरी

जीव म्हणून जन्माला आलो आहोत तर मरण हे येणार हे जेवढे सत्य आहे तेवढेच सत्य हे आहे की परमात्म स्वरूपात एकरूप झाल्यावर जन्ममरणाच्या तावडीतून सुटका होते. ज्ञानी पुरूषांच्या अविद्या आणि जीवपण स्वरूप साक्षात्कार मुळे नाहीशा होतात. ज्ञानी पुरूष जीवरूप नसून परमात्म स्वरूप असतो. तो निर्गुण असतो. ज्ञानाच्या परमोच्च पदाला पोहचलेला जन्ममृत्युचे भय धरत नाही. त्यासाठी एक ऊदा नेहमीच सांगितले जाते की, तळपत्या सुर्या वर भर बारा वाजता थुंकले तर ती थुंकी परत त्यांच्याच अंगावर पडेल. किंवा दुसऱ्याचे वाईट चिंतले तर आपलेच वाईट होते. म्हणून कधीच कुणाचे वाईट करू नये.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# सर्व दु:खांचे मूळ देहबुद्धी आहे

आधुनिक केसरी

परमार्थाचा विषय तसा खरोखरच कठीण आहे, आणि सर्वांना नडणारा आहे. ज्याला हा विषय जाणून घ्यायचा असेल त्याला, मी कोण हे जाणण्यापेक्षा, मी कोण नव्हे हे जाणणे महत्त्वाचे आहे. एखाद्या पाऊलवाटेने जात असताना ती वाट चुकलो आणि आपण भलत्या मार्गाला लागलो तर त्यापुढला सर्व व्यवहार चुकत जाणार. एखादे गणित सोडविताना एखाद्या आकड्याची चूक झाली की त्यापुढले सर्व गणित चुकत जाते, किंवा, एखाद्या रोगाचे निदान बरोबर झाले नाही तर मग त्या रोगावर केलेली औषधयोजना फुकट जाते, त्याप्रमाणे, मनुष्याच्या सर्वसामान्य गुणधर्मांचे आकलन जर बरोबर झाले नाही, तर या गुणधर्मावर आधारलेला परमार्थाचा मार्गही जाणणे फार कठीण गोष्ट होईल. आपण आनंदी असावे, नेहमी आनंदात रहावे, असे सर्वांनाच वाटते; हा झाला पहिला गुणधर्म. या आनंदात चिरंतन असावे, निदान आनंदाच्या अपेक्षेत तरी चिरंतन राहावे, असेही आपल्याला वाटते. खरे म्हणजे मरण कुणालाच आवडत नाही; जगण्याची हाव



किंवा चिरंतन राहण्याची आवड आपल्याला सर्वांनाच असते. परमेश्वर आनंदरूप आहे, तो चिरंतन आहे; आपल्या ठिकाणी तो अंशरूपाने असल्याने आपल्यालाही तसे राहणे साहजिकच आवडते. पण आपली मुळात वाट चुकली, आणि म्हणून त्यापुढले सर्व व्यवहारही चुकत गेले. एखाद्याच्या परसातले झाड पडल्यावर तो ‘ माझे झाड पडले ’ असे म्हणतो, परंतु त्याचा देह पडल्यावर ‘ त्याचे शरीर पडले ’ असे नाही आपण म्हणत, ‘ तो मेला ’ असे म्हणतो. म्हणजेच मुळात चूक ही की, आपण स्वतःला देह समजूनच राहतो. देह माझाच समजून त्याच्यावर प्रेम करतो, ही पहिली चूक. नंतर, या देहाचे गुणधर्म म्हणजे विकार आपल्याला चिकटल्यावर, त्यांचीच जोपासना करतो, ही दुसरी चूक. एकदा हे विकार चिकटल्यावर, त्यांची वाढ न थांबविता, ते नेतील तिकडे त्यांच्या पाठीमागे जाणे, आणि त्याकरिता वेळप्रसंगी आपली बुद्धीही गहाण टाकणे, ही तिसरी चूक. अशा रीतीने चुकांनी चुका वाढत जाऊन आयुष्याचे गणित मग साफ चुकते. एखादे झाड तोडायचे असेल तर प्रथम त्याच्या फांद्या तोडाव्या लागतात, आणि नंतर बुंधा तोडतात; तसे, नीतिधर्माने वागणे म्हणजे देहाला लागलेल्या विकाराच्या फांद्या तोडण्याप्रमाणेच आहे. दुसरी योजना म्हणजे सगुणभक्तीची. सगुणभक्ती करताना माणूस क्षणभर का होईना स्वतःला विसरतो, आणि ‘ मी तुझा आहे ’ असे म्हणतो. या भगवंताचा सतत सहवास जर कशाने लाभत असेल तर त्याच्या नामानेच. या नामाच्या सहवासात राहिल्याने देहावरचे प्रेम आपोआप नष्ट होईल, आणि मग देहाने मांडलेल्या प्रपंचावरचेही प्रेम कमी होईल. पुढे त्याला सर्वत्र परमेश्वरच दिसेल. तेव्हा आत्तापासून, मी राहीन तर नामातच राहीन असा निश्चय करा. मला खात्री आहे, राम तुमच्यावर कृपा करील.

## कान्होपात्रा

आधुनिक केसरी

सामान्य कुटुंबात जन्मालाआलेल्या आणि विठ्ठलभक्तिपर अभंगरचना करणाऱ्या कान्होपात्रा या इ.स.च्या १५ व्या शतकातील वारकरी संप्रदायातील एक महत्त्वाच्या संतकवयित्री होत्या. पंढरपूर जवळच्या मंगळवेढा येथे त्यांचे वास्तव्य होते. बिदरच्या बादशहाने मागणी घातली म्हणून संत कान्होपात्रा यांनी पंढरपूरला विठ्ठलचरणी डोके ठेवून प्राण सोडले. विठ्ठलभक्तीचा लखलखीत आविष्कार घडवणाऱ्या संत कान्होपात्रा विषयी फार कमी माहिती उपलब्ध आहे. त्यांनी बरीच अभंगरचना केली असावी, पण ते लिहून ठेवणारं कुणी नव्हतं. त्यामुळे त्यांचं खूप थोडं काव्य उपलब्ध आहे. पण त्यांचं जे भक्तीरसपूर्ण अभंग उपलब्ध आहेत त्यातल्या विठ्ठलभक्तीच्या आविष्काराने आपण दिपून जातो. शामा नावाच्या अतिशय धनवान, रूपसंपन्न गणिकेच्या पोटी तिचा जन्म झाला. ऐषोआरामी आणि सुखोपभोगी वातावरणात ती वाढली. त्या घरात विठ्ठलभक्तीची परंपरा असणं शक्यच नव्हतं. वेश्याकुळातल्या स्त्रीला गुरू तरी कुठला लाभणार? पण गणिकेच्या रूढ अशा भोगविलासी मार्गाकडे न जाता ती परमार्थ मार्गाकडे वळली आणि उत्कट भक्तीने परमेश्वरस्वरूप पावली.

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, २७ जानेवारी २०२४

adhunikkesari.com Adhunik Kesari


# कर्तव्यनिष्ठेने, देशहिताच्या विचाराने कार्य केल्यास प्रगती शक्य

## सुधीर मुनगंटीवार : प्रियदर्शिनी इंदिरा गांधी स्मृती विशेष सेवा पुरस्काराचे वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** कोणताही जिल्हा किंवा देश घडवायचा असेल, समाजाची प्रगती साधायची असेल तर सेवाभावी वृत्तीने कार्य करणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे नितांत गरजेचे आहे. कर्तव्यनिष्ठेने, देशहिताच्या विचारांनी कार्य केल्यास जिल्हाच काय देशाचीही प्रगती संभव आहे, असे ठाम प्रतिपादन राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. प्रियदर्शनी चौकात आयोजित प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्मृती विशेष सेवा पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते.

माजी खासदार तथा प्रियदर्शिनी इंदिरा गांधी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष नरेश पुगलीया, राहुल पुगलीया शांतीधाम ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. अशोक वासलवार, डॉ. दुधलवार आदी याप्रसंगी उपस्थित होते. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'जब तक सूरज चांद रहेगा, हमारा तिरंगा लहराता रहेगा' या भावनेने, कर्तव्यनिष्ठेने, देशहिताच्या विचाराने काम करण्याचा संकल्प केला जातो. या संकल्पाची पूर्तता करायची असेल तर सेवाभावी वृत्ती गरजेची आहे. असा सेवाभाव असणाऱ्यांच्या पाठीशी समाजाने उभे राहावे. शुद्ध हेतू ठेवून श्री. नरेश पुगलीया व त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून सामाजिक आणि




संवेदनशीलपणे कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात येत आहे. कोणतीही बाब स्थायी नाही. प्रत्येकच व्यक्ती एखाद्या विशिष्ट काळासाठी एखाद्या पदावर कार्यरत असतो. एखादा व्यक्ती पदावर असताना त्याने केलेल्या कार्याच्या आठवणी राहुन जातात. याच कारणामुळे जिल्ह्याच्या, देशाच्या विकासाकरीता जे काही करता येईल, ते करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सुधीर मुनगंटीवार म्हणाले. आपला माझा नेहमी संकल्प राहिला आहे, जे कार्य करणार ते महाराष्ट्रातच नाही तर भारतात उत्तम व्हावे. अर्थमंत्री असताना गोरक्षणावर योजना तयार केली. नुकतीच 'टायगर प्रोजेक्ट'ची बैठक पार पडली. तेव्हा आग्रहपूर्वक गोरक्षणाचा मुद्दा मांडला. सक्षम गो पालनासाठी सर्वत्र कुरण विकसित केले पाहिजे. चंद्रपुराच्या प्रगतीत शांतीधाम हा सुद्धा महत्त्वाचा प्रकल्प आहे. गेल्या 17 ते 18 वर्षाआधी या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता देखील नव्हता. काही संस्थांच्या पुढाकाराने तेथे बऱ्यापैकी काम झाले. शांतीधामचे उत्तम 'डिझाईन' तयार करावे, अशी सूचना ना. श्री. मुनगंटीवार यांनी केली. लहान विकासकामे देशील देशाच्या प्रगतीसाठी मोलाची आहे, ती कामे उत्तम नियोजन करून केलेली असावी, त्याचा लाभ सामान्य जनतेला व्हावा, अशी विकासकामे चंद्रपूर जिल्ह्यात झाली आहे, असे मुनगंटीवार यांनी नमूद केले.

**विकासाच्या दिशेने घोडदौड :** जिल्हात मेडिकल कॉलेज, कॅन्सर हॉस्पिटल उभे राहत असून वेगाने पूर्णत्वास येत आहे. ईएसआयसीचे 100 बेडेड हॉस्पिटल चंद्रपूर–बल्लारपूरच्या मध्ये उभे राहत आहे. केंद्राचे पर्यावरण सचिव यांनी नुकतीच वन अकादमीला भेट दिली. वन अकादमीला तीन स्टार मानांकन प्राप्त झाले. वन अकादमीचे हे मानांकन देशात नंबर एकचे आहे. जिल्ह्यातील मुलींसाठी 62 कौशल्य आधारित प्रशिक्षण देणारे एसएनडीटी विद्यापीठाचे भव्य उपकेंद्र उभे राहत आहे. यामध्ये जिल्ह्यातील महिला उत्तम कौशल्य शिक्षण घेऊन आर्थिक स्वातंत्र्याच्या लढाईमध्ये योगदान देऊ शकेल. असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. बारामती पेक्षाही चंद्रपूर हा वेगाने पुढे जात असल्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यावेळी म्हणाले.

**सेवा पुरस्काराचे वितरण :** प्रियदर्शिनी इंदिरा गांधी स्मृती प्रतिष्ठान, चंद्रपूरच्या वतीने देश विकासासाठी व समाज उत्थानासाठी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थेला किंवा व्यक्तीला प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्मृती विशेष सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षीचा पुरस्कार शांतीधाम सामाजिक संस्थेला प्रदान करण्यात आला. पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक वासलवार यांना रोख रक्कम रु. 1 लक्ष 11 हजार 111 रुपये व सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले.



# इटली ग्रामपंचायत तर्फे प्रजासत्ताक दिनानिमित्त निमित्त आदर्श शिक्षक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतर :** तालुक्यातील इटोली ग्रामपंचायतच्या माध्यमातून आज 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्या स ग्रामपंचायत च्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आले. सरपंच सौ संगीता जगदीश घुगे ,उपसरपंच सौ छाया नवनाथ मेनकुदळे व सन्माननीय ग्रामपंचायत सदस्य यांनी ध्वजारोहण बालूआप्पा तडकसे यांच्या हस्ते करण्यात आले .त्यानंतर आदर्श शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. ठेग सर साईबाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय इटोली, पोघे सर संत भगवान बाबा माध्यमिक उच्च माध्यमिक आश्रम शाळा इटोली, श्रीमती नागरगोजे मॅडम जि.प.के.प्र.श. इटोली,
श्रीमती दिघेकर मॅडम साईबाबा प्राथमिक शाळा साईनगर तांडा इटोली, हाके सर विद्यानिकेतन इंग्लिश स्कूल इटोली.
वरील सर्व मान्यवरांना इटोली ग्रामपंचायत च्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले .यामुळे आज ईटोली येथे शैक्षणिक वातावरणात उत्साह दिसुन येत होता.

# राष्ट्रसंत भगवान बाबांचे विचार समाजास प्रेरणादायी : डॉ. गोपाल बछिरे


आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे विचार समाजास अंधश्रद्धे पासून दूर करून शिक्षण व समतेकडे वळवणारे आहेत असे वक्तव्य डॉ. गोपाल बछिरे शिवसेना जिल्हा संघटक यांनी अभिवादन सभेत केले. शिवसेना भवन लोणार येथे अभिवादन सभा गजानन जाधव शिवसेना शहर प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली याप्रसंगी भगवान बाबाच्या संपूर्ण जीवन प्रवासावर प्रकाश टाकण्यात आला त्यांनी केलेले शैक्षणिक कार्य सामाजिक कार्य अंधश्रद्धेवर कडाडून केलेली टीका या संपूर्ण बाबींचा उलगडा डॉ. बछिरे यांनी केला.
याप्रसंगी तालुका संघटक कैलाश अंभोरे, शहर उपप्रमुख लुकमान कुरेशी, माजी नगरसेवक श्याम राऊत, शहर संघटक तानाजी मापारी, ज्येष्ठ नेते प्रकाशभाऊ सानप, ज्येष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे, रंगराव मुंडे, अनिल पसरटे, किरण कमडे, प्रसेनजित बच्छिरे, सह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लुकमान कुरेशी यांनी केले तर आभार शाम राऊत यांनी मानले.



# महेश उबाळे चौथ्यांदा संचालकपदी

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** नुकत्याच झालेल्या मजुर सहकारी फेडरेशनच्या निवडणुकीत खुलताबाद पंचायत समितीचे माजी सभापती महेश भाऊराव उबाळे पाटील हे चौथ्यांदा संचालकपदी निवडून आले आहे. गेली १७ वर्षापासून मजुर सहकारी फेडरेशनच्या संचालक पदी पाटील कार्यरत आहेत.यंदा पुन्हा त्यांनी बाजी मारुन संचालक पद आपल्या ताब्यात ठेवले आहे.निवडून येताच त्यांच्या चाहत्यांकडून एकच जल्लोष करुन गुलाल फटाके फोडत आनंद व्यक्त करण्यात आला.ठिकठिकाणी त्यांचें सत्कार अभिनंदन होत आहे.

# सावळेद्वार येथून संत गजानन महाराजांची पायदळ दिंडी शेगावला रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील हारि हारेश्ववर विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथील मंदिरातून दि.२५/१/२४ गुरुवार रोजी सकाळी दहा वाजता पायदळ दिंडीला शेगावला रवाना झाली. गेल्या २२ वर्षांपासून ही पायदळ यात्रा सावळदबारा ते शेगाव येथे काढण्यात येते.ग्रामस्थाच्यां सहकार्याने पालखी महोत्सवाला प्रारंभ झाला. पायदळ दिंडी यात्रा २८ जानेवारीला शेगावला पोहचणार असून २८ जानेवारी रोजी शेगावला श्री गजानन महाराजांना तिळगुळ अर्पण करून दिंडी सावळदबारा परत येणार आहे.
पालखी दिंडी यात्रा २२ वर्ष पासून सुरू झाली. या पायदळ दिंडी यात्रेत तीनशे ते चारशे भक्तांनी सहभाग नोंदविला होता.जय गजानन श्री गजानन महाराजांच्या जयघोषाने परिसर सावळदबारा व देव्हारी परिसर दणाणला. पायदळ दिंडी यात्रेतील पालखीचे गजानन भक्तांनी सावळदबारा गावात



चौकात चौकात दर्शन घेतले. पालखी सर्वप्रथम कोलते पाटील पंपावर येताच सावळदबारा येथील उपसरपंच मो. आरिफ मो. लुखमान यांनी संत गजानन महाराज पालखीतील सर्व भाविक भक्तांना टोपी, रुमाल देऊन त्यांचा सत्कार करुन स्वागत केले व देव्हारी येथील गजानन महाराज मंदिराचे दर्शन घेऊन पालखी शेंगावकडे रवाना झाली. पिंपळवाडी,महाल्लदा मार्गे लालमाती येथून रोहीणगेडला पोहचली.गुरुवारी रोहिणखेड गाव येथील राजू गलबले यांच्याकडे भोजन व मुक्काम करून पुढील प्रवासासाठी रवाना होणार झाली. अशी माहिती आयोजकांनी दिली.
हारि हारेश्ववर विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे आयोजक हभप वासुदेव महाराज खडके, हभप आबाराव महाराज कोलते, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाआप्पा चोपडे, ग्रामपंचायत माजी सदस्य प्रमोद काळे,देवाआप्पा पंधाडे , पंढरी आप्पा कुल्ले,यांच्या नेतृत्वात पायदळ दिंडी यात्रा सावळदबारा वरून शेगाव करिता रवाना झाली. त्यावेळेस पालखीचे देव्हारी येथील माजी सभापती चुनीलाल चव्हाण यांनी स्वागत करुन दर्शन घेतले व भाविक भक्तांना पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.या दरम्यान रोहिणखेड येथे सकाळी चहा बिस्कीटचे वितरण केले. दिंडी यात्रेत सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे,माजी सरपंच स्वातीताई भाऊराव कोलते, योगिता देशमुख,कोमल देशमुख,चित्राताई देशमुख,वनिता काळे आणि रमेश देशमुख यांनी पालखीचे स्वागत करून गजानन महाराजांची आराधना केली.

# पद्मनाभ सिंहांचा दावा

आधुनिक केसरी

२२ जानेवारी हा दिवस भारताच्या इतिहासातला सर्वात महत्त्वाचा दिवस मानला जाणार आहे. कारण या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अयोध्येतील राम मंदिरात रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सगळा देश राममय झाला आहे, असे भाजपाचे नेते म्हणत आहेत. तसेच प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात सहभागी झालेले साधू-संतही हेच म्हणत आहेत. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राम मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेच्या सोहळ्याच्या दिवशी संध्याकाळी दिवाळी साजरी करण्याचे आणि रामज्योती प्रज्वलित करण्याचे आवाहन केले. आता राजस्थानाच्या राजघराण्यातले पद्मनाभ सिंह यांनी दावा केला आहे, की आम्ही प्रभू रामाचे वंशज आहोत. त्यासाठी त्यांनी वंशावळही दाखवली आहे. राजस्थानच्या 'सूर्यवंशी राजपूत' नावाच्या शाही घराण्याने रामाच्या अस्तित्वाचा दावा तर केलाच आहे. शिवाय वंशावळ दाखवली आहे आम्ही रामाचे वंशज आहोत असा दावा केला आहे. जी वंशावळ पद्मनाभ सिंह यांनी पोस्ट केली आहे त्या पोस्टमध्ये प्रभू रामाचे आणि महाराज दशरथांचे नावही दाखवले आहे. इतिहासकारांनीही हा दावा केल्याचे त्यांनी म्हटले आहे की, आम्ही रामाचे वंशज आहोत. राजस्थानच्या मेवाड मधले महाराजा सवाई पद्मनाभ सिंह यांचे घराणे हे रामाचे घराणे असल्याचे इतिहासकार म्हणाल्याचेही जयपूरचे महाराजा सवाई पद्मनाभ सिंह यांनी म्हटले आहे. इतिहासकारांनी म्हटले आहे की, पद्मनाभ सिंह यांचे घराणे शिवभक्त आणि सूर्यवंशी आहे त्यामुळे ते प्रभू रामाचे वंशज आहेत. महाराज सवाई पद्मनाभ सिंह हे भारतातले प्रसिद्ध खेळाडू आहेत. अमजेरच्या मेयो महाविद्यालयात आणि इंग्लंडच्या समरसेट स्ट्रीटच्या पब्लिक स्कूलमध्ये त्यांचं शिक्षण झालं आहे. त्यांची आजी राजमाता पद्मिनी देवी यांनी पद्मनाभ सिंह यांचे नाव दिले आहे. राजघराण्याचे पद्मनाभ सिंह यांनी वंशावळ पोस्ट केली आहे. इतकेच नाही तर अयोध्येतला फोटोही पद्मनाभ सिंह यांनी राम मंदिर प्राणप्रतिष्ठेच्या दिवशीचा फोटोही शेअर केला आहे.

# स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे वाटसरू होऊ



डॉ. प्रकाश खेत्री
संपर्क ७८४३०९२२४४

आधुनिक केसरी

स्वामी विवेकानंद यांनी १८९७ साली अमेरिकेतून भारतात परतल्यावर आपल्या पहिल्या भाषणात मद्रास (चेन्नई) येथील युवकांसाठी हे आवाहन केले होते. स्वामिजींचा युवाशक्तीवर खूप मोठा विश्वास होता आणि तो त्यांनी आपल्या अनेक भाषणांतून व्यक्तही केला होता. युवकांमध्ये सकारात्मक ऊर्जा जागृत करून तिचा उपयोग केला तर युवक निश्चितच आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकतात. स्वामी विवेकानंद यांचे संमग्र विचार, आचार आणि कार्य हे पुरोगामी आणि प्रेरणादायी होते. त्यांच्या शिकवणीमधून आजच्या या सामाजिक, राजकिय, धार्मिक आणि यंत्रयुगाच्या परिस्थितीत युवा पिढीला दिशा मिळेल. जगण्याची नवी प्रेरणा, उमेद आणि उर्जा प्राप्त होईल. असा विश्वास वाटतो.

स्वामी विवेकानंद म्हणतात, "सशक्त, उत्साही, श्रध्दावान व निष्कपट असे युवक हवे आहेत." १०० युवक जग हादरून टाकू शकतात. "आजच्या तरूण पिढीने संघर्ष करून यशाची शिखरे गाठली पाहिजेत", "जीवन म्हणजे गतिमानता ! जो आयुष्यात थांबला त्याची प्रगती थांबली !", "युवकांनो, झेप घ्या. दिशा तुम्हाला शरण येतील.", "सामर्थ्य म्हणजेच जीवन आहे आणि दुर्बलता म्हणजे मृत्यू आहे, चारित्र्याचे सामर्थ्य वापरून आपला युवावर्ग भविष्यात आपल्या देशामध्ये प्रगती घडवून आणेल," "परस्पराशीं कलह करणें किंवा शिवीगाळ करणें हे आपले राष्ट्रीय दुर्गुण आहेत", "युवकांनो, तुम्ही अमृताचे पुत्र आहात, राष्ट्राला युवाचेतनेची आवश्यकता आहे." "नाना प्रकारच्या आमिषांना, प्रलोभनांना, व्यसनांना बळी न पडता, आपली सकारात्मक ऊर्जा राष्ट्र निर्माणाच्या कार्यासाठी, समाजहितासाठी वापरायची नैतिकता ज्यांच्यात असते तो खऱ्या अर्थाने देशाचा आदर्श युवक होय. भविष्यातील देशाचा आधारस्तंभ होय. असे युवक ज्या देशात, ज्या समाजात राहतात, तो देश तो समाज बलवान होतो." "धैर्याने, शौर्याने पुढे चला. एखादया दिवसात वा एखादया वर्षातच यश आपल्या पदरी पडेल अशी अपेक्षा बाळगू नका, मतलब आणि स्वार्थपरायणता या दोन्ही गोष्टी टाळा. यांच्याविषयी सर्वदा प्रामाणिक राहा. म्हणजे अवघे जग हलवून सोडाल. लक्षात ठेवा की, स्वतःचे व्यक्तिमत्त्व, स्वतःचे जीवन हेच शक्तीचे रहस्य आहे. अन्य काही नाही." "स्वामीजींनी एका शिष्याला भगवद्गीता वाचण्यापेक्षा बाहेर जाऊन फुटबॉल खेळ असा सल्ला दिला होता, "बलवान व निरोगी शरीरात सशक्त मन नांदते. अशक्त शरीरात तसे होणे संभव नाही." "माझी खात्री आहे की, एखादा वृद्धाश्रम चालविण्यापेक्षा बालशिक्षण केंद्र चालविणेच अधिक चांगले आहे." हे सर्व विचार आजच्या (मोबाईल, टी.व्ही., इंटरनेट, ऑनलाईन गेम ) आभासी आनंद घेणाऱ्या युवकांना प्रत्येक्ष जीवन जगण्यास आणि आनंद घेण्यास प्रवृत्त करणारे आहेत. स्वामी विवेकानंद यांनी वैश्विक एकतेच्या विचारातून सर्व मानवजातीला बंधूतेचा, मानवतेचा संदेश दिला आहे. "समाजातील सर्व मुला-मुलींनाही समान शिक्षण दिले पाहिजे. मुलांचा शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक विकास होऊ



शकेल. ज्यातून मुलाचे चारित्र्य तयार होते, मन विकसित होते, बुद्धी विकसित होते आणि मुल स्वावलंबी होतात, अशा प्रकारे शिक्षण दिले पाहिजे. लौकिक व इतर जगातील विषयांना अभ्यासक्रमात स्थान दिले पाहिजे. त्यामुळे वैश्विक पातळीवर शिक्षणाचा संबंध जोडला जाईल. शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे नाते शक्य तितके जवळचे असावे. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी तांत्रिक शिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे. मानवी व राष्ट्रीय शिक्षण कुटुंबातून सुरू झाले पाहिजे. त्यातूनच उद्याचा देशाचा रक्षक प्रतिभाशाली युवक तयार होईल ही कल्पना होती. अशी शिक्षणाविषयी त्यांची भूमिका होती." "देशाची युवाशक्ती आत्मनिर्भर होईल व देशाच्या राष्ट्रबांधणीत त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा असेल. याच दृष्टीकोनातून शिक्षण हे राष्ट्राच्या नागरिकांना प्रतिभासंपन्न, शिस्तप्रिय, चारित्र्यवान व जबाबदार नागरिक घडविण्याचे महत्वपूर्ण माध्यम म्हणून विवेकानंदांनी शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला. आयुष्यभर त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला. स्वतःच्या आयुष्यातही त्यांनी या मूल्यांचे पालन केले" आजच्या युवकांनी शिक्षण घेताना केवळ पदवी व माहिती प्राप्त न करता, त्याच्या गुणांचा आविष्कार, त्यांच्या चारित्र्याचे संवर्धन, विश्वबंधुत्वाची जाणीव आणि स्वतःच्या बलस्थानाची ओळख करून घेतली तर खऱ्या अर्थाने आजच्या युवकांना विवेकानंद ज्ञात झाले, असे म्हणता येईल. आपला धर्म खणखणीत शब्दांत स्पष्टपणे सांगतो की, "बाळांनो, तुम्ही इंद्रियांचे गुलाम आहात, या इंद्रियांचे भोग क्षणभंगुर आहेत आणि ही इंद्रिये शेवटी आपल्याला विनाशाकडेच घेऊन जातात. येथील चार दिवसांच्या विलासाने अखेरीस सर्वनाश मात्र ओढवतो. या सर्वांचा त्याग करा, इंद्रिये व जग यांविषयीची आसक्ती सोडून द्या; हाच धर्माचा मार्ग आहे." ध्येयसिद्धीचा मार्ग त्यागातून आहे, भोगातून नाही." माझ्या मित्रांनो, "जातीजातींनी भांडत बसणे योग्य नाही. त्यामुळे कोणते हित होणार आहे? त्यामुळे आपण अधिक विभागले जाऊ, अधिक दुर्बल होऊ, अधिक अधोगतीस जाऊ. जन्मजात हक्कांचे व विशेष अधिकारांचे दिवस आता कायमचे संपले आहेत." "मी जगात कुठेही गेलो तरी माझी जन्मभूमी हीच मला सर्वाहून जास्त प्रिय आहे." शेकडोवर्षांपूर्वीचे स्वामी विवेकानंद यांचे विचार आजही प्रेरक आणि उपयुक्त आहेत. स्वामी विवेकानंद एक महान विचारवंत, तत्वज्ञानी, समाजसुधारक तसेच जगविख्यात सन्यांशी होते. त्यांचा प्रभाव अनेक विचारवंत आणि सुधारक यांच्यावर होता. विवेकानंदांचे राजयोगावरील पुस्तक टॉलस्टॉयच्या हाती पडले होते, त्या पुस्तकांचा त्यांच्यावर विलक्षण प्रभाव होता. २९ मार्च, १९१० रोजी सुप्रसिद्ध झेक विचारवंत जॉन मॅसरिक यांच्याशी बोलतांना टॉलस्टॉय म्हणाले - "आधुनिक भारतातील सर्वात श्रेष्ठ तत्त्वज्ञ म्हणजे विवेकानंद होय." "टॉलस्टॉय यांनी विवेकानंदांची तुलना सॉक्रेटिस, प्लेटो या प्राचीन तर काण्ट आणि शॉपेनहोर या आधुनिक तत्वज्ञांच्या मालिकेत केली आहे." जवाहरलाल नेहरू म्हणाले, "गतकाळाच्या पायावर उभे असून आणि भारताच्या सांस्कृतिक वारशाचा जाज्वल्य अभिमान बाळगूनही जीवनातील प्रश्नांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी आधुनिक व प्रागतिक होती, दलित व पतित हिंदू जातींना संजीवित करून त्यांनी तिला आत्मनिष्ठा प्रदान केली." विवेकानंदांच्या पुस्तकांचे मोठेपण सांगताना महात्मा गांधी म्हणाले, "त्यांच्या ग्रंथांचा कुणीही परिचय करून देण्याची काहीच गरज नाही. ते शब्द आपोआप थेट हृदयाला जाऊन भिडतात." आणि रोमां रोला यांनी म्हटले आहे, "त्यांच्या ग्रंथातील हे शब्द त्यांनी तीस वर्षांपूर्वी उच्चारलेले आहेत, पण विचार आजही नवे वाटतात. ते वाचताना शरीरभर वीज खेळल्यासारखे वाटते- मग त्यांच्या तोंडून ते शब्द ऐकणाऱ्यांना किती हादरे बसले असतील. कशी धुंदी चढली असेल!" राजा अजितसिंग खेत्री यांनी १० मे,१८९३ ला त्यांना 'विवेकानंद' हे नाव दिले, असे सांगितले जाते. स्वामी विवेकानंद यांचे मूळ नाव नरेंद्र होते. बंगालमध्ये वडील विश्वनाथ दत्त आणि भुवनेश्वरी देवी यांच्या पोटी त्यांचा जन्म उत्तर कोलकत्ता सिमलापल्ली येथे १२ जानेवारी, १८६३ रोजी झाला, विवेकानंद लहानपणापासूनच प्रतिभावान होते. ४ जुलै,१९०२ दिवशी त्यांनी कोलकत्ता मध्ये बेलूर मठात समाधी घेतली.

# जीवनात उत्कर्षाचं वेड असलं पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

जीवन म्हटलं की वेड छंद आलाच आणि तो असलाच पाहिजे पण वेड कशाच असलं पाहिजे हे खुप महत्वपूर्ण आहे.जीवनाचा उत्कर्ष होण्यासाठी प्रयत्नशील असण्याच वेड हे असलच पाहिजे.एखाद्या विषयाचा बाबीचा आपल्यावर एवढा प्रभाव निर्माण होण कि त्या प्रभाव समोर आपण स्वतःला विसरून जाण. हि अवस्था प्रभाव म्हणजे वेड हाच प्रभाव जिकडे घेऊन जाईल तिकडे आपण जाण म्हणजे वेड सदृश्य अवस्था असून वेड चांगलही असतं आणि वाईटही असतं आपण कोणत वेड लाऊन घेतो त्यानुसार आपली प्रतिमा ठरते. आपल्या जीवनातील आपल्याला लागलेलं एखाद्या विषयाच वेड हे नशेच्या दिशेने घेऊन जाऊन जीवन उध्वस्त करणार नसलच पाहिजे.वेड असणं हे जरी गैर नसलं तरी ते जर निरर्थक विषयाचं लागलं आणि त्याच नशेत रूपांतर झालं तर मग मात्र ते वेड आपलं आयुष्य आणि भविष्य उध्वस्त करून सोडत.

कोणत्याही क्षेत्रातील गोष्टीचा आपल्यावर किती प्रभाव होऊ देयचा हे सर्वस्वी आपल्यावर अंवलबुन असत.निर्थक बाबीच वेड हे आयुष्य बरबाद करणार ठरत असल्याने जीवना विषयी आपण खूप सजग आणि जागृत राहण्याची आवश्यकता असते.पण खरंच आपण एवढे सजग आणि जागृत असतो का तर बहुतांश वेळा नाही किंवा खुप अल्प प्रमाणात जागृत असतो.त्यामुळे जीवनात अनेक पडझडी होतात चढ उतार येतात आणि त्याचे दृश्य परिणाम पण आपण भोगतो.हे सगळं नेमकं का होत तर याची मुळ पार्श्वभूमी हि हिच आहे कि आपल्याला लागलेलं वेड हे निरर्थक विषयाचं होत.म्हणून वेड असलच पाहिजे पण ते असणारं वेड हे योग्य धेय्याच,विधायक कार्यच आणि सात्विक,वृत्तीच, सत्यनिष्ठ मार्गाने मार्गक्रमण करण्याचं त्या सोबतच परोपकार निस्वार्थ भाव,लोक कल्याणासाठी आयुष्य समर्पित करण्याच सदाचार,आचरणाच नक्कीच असलं पाहिजे.तेव्हाच आपल्याला योगायोगाने मिळालेल आयुष्य कारणी सार्थकी लागत . नाही तर आयुष्य उध्वस्त होऊन निरर्थक गेलं म्हणून समजायचं.आपलं जीवन हे जरी न उलगडणार कोड असलं तरी आपल्या वाट्याला आलेल आयुष्य हे कोणत्याही परिस्थितीत आपल्याला जगावच लागत आपण त्या पासून पळ काढु शकत नाही हे वास्तव सत्य आहे.पण हेच जीवनातील क्षण जगत असताना वेगवेगळ्या विषयांना भुमिकांना सुद्धा आपल्याला समोर जावं लागतं.त्याच वेळी आपल्यावर आपल्या वेडचा परिणाम जीवन उद्ध्वस्त करणारा नसला पाहिजे.प्रत्येक व्यक्ती आपल्या आयुष्यात कोणत्या तरी विषयांवर बाबींवर वारंवार चिंतन करून त्या पद्धतीने आपलं आयुष्य घडविण्यासाठी प्रयत्न करत असतो.पण याच दरम्यान आपण कोणत्या विषयाचा वेड स्वतः ला लावुन घेतो त्यावर आपलं चांगलं वाईट भविष्य अंवलबुन असत आणि या मध्ये वेळेच खुप महत्व असतं म्हणजे एकंदरीत वेळ आणि वेड याच सुयोग्य नियोजन करून योग्य पथ मार्ग असेल तर मग जीवन सार्थकी लागला म्हणून समजायचं आणि जर वेळ वेड याच नियोजन चुकलं आणि दिशाही चुकली तर मग मात्र आपलं जीवन उध्वस्त होऊन पश्चात्ताप पदरी येणार.याची काळजी घेतली तरच ह्या वेडाच आपल्याला सदउपयोग होतो.अन्यथा वेड हे जीवन बरबाद केल्या शिवाय सोडत नाही. म्हणजे एक तर यशोशिखरावर जाण्यासाठी किंवा आयुष्य बरबाद करण्यासाठी या दोनच परस्पर विरोधी बाबींसाठी आपल्या आयुष्यात आपल्याला लागणार्या वेडाचा उपयोग होत.म्हणून कोणत वेड लागलं पाहिजे याचं अगोदर मुल्यमापन करणं गरजेचं आहे.वेडाचे जे दोन प्रकार आहेत त्यापैकी एक परिणाम आपल्याला मिळण निश्चित असतो.आयुष्यच कल्याण किंवा आयुष्य बरबाद या पैकी कोणता परिणाम निवडायचा आणि कोणता परिणाम स्वीकारायचा नाही हे सर्वस्वी आपल्यावर अंवलबुन असत.आणि याच दरम्यान आपल्या आजूबाजूला असणार वातावरण परिसर , संस्कार ,याचा सुद्धा आपल्या वेडावर खुप मोठा परिणाम असतो . आपलं वेड हेच आपलं आयुष्य आणि भविष्य निश्चित करत असत . म्हणून आपण आपल्या आयुष्यात मार्गक्रमण करत असताना वेळ काळ परस्थिती हि खुप महत्वाची असती,बाल वयात योग्य ज्ञान अभ्यास केला तर त्याचे परिणाम आपल्याला युवा अवस्थेत पाह्यला मिळतात आणि आणि युवा अवस्थेत,संयम, स्थिरता,सत्यता, सात्विकता,वैचारिक प्रगल्भता,सुसंगती, आणि आध्यत्मिक आचरण असेल तर जीवनातील खुप मोठे अनर्थ टळतात.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# प्रजासत्ताक दिनानिमित्त भाजपा प्रदेश कार्यालयात ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात 75 व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने कारसेवक व ज्येष्ठ छायाचित्रकार मोहन बने यांच्या हस्ते शुक्रवारी ध्वजारोहण तसेच भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी आ.श्रीकांत भारतीय, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, प्रदेश प्रवक्ते अतुल शाह, ओमप्रकाश चौहान , प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी, सहसचिव भरत राऊत आदी उपस्थित होते.

# ज्ञानकुंज महाविद्यालय येथे प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** उत्साह साजरा आज दिनांक 26 जानेवारी 2024 रोजी ज्ञनकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय मध्ये ध्वजारोहणाचा कार्यक्रम व मोफत आरोग्य शिबीर हा कार्यक्रम पार पाडण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले गावचे उपसरपंच कारभारी पाटील नलावडे व आदर्श शिक्षक सेवानिवृत्त मा.श्रीधर पाटील सर व इंदापूरचे चेअरमन निकम पाटील व ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव श्री. राधाकृष्ण द्वारकुंडे साहेब व ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य माननीय श्री इंद्रजीत जगताप साहेब व सार्थक विजय द्वारकुंडे साहेब हे होते. या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता सरस्वती व भारताचे संविधान त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडण्यात आले व गावचे उपसरपंच यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे कर्मचारी योगेश झिंजुर्के, मनोज राणे, योगिता पारनेरे नितीन पवार, राम राठोड, वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण, अविनाश गाडेकर,योगेश सुरडकर, श्रीमती सुरेखा जाधव उपस्थित होते.



# माहिती अधिकारी काझी यांचा पालकमंत्र्यांकडून सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्हा माहिती कार्यालयातील माहिती अधिकारी यासेरोद्दीन मखदुम काझी यांना आज 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रा. डॉ.तानाजीराव सावंत यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

राज्यातील जनतेच्या दैनंदिन जीवनात माहिती व जनसंपर्क विभागाचे अनन्य साधारण महत्व लक्षात घेता प्रभावी वार्तांकन व प्रशासन आणि माध्यमामधील सुसंवाद साधून उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल तसेच सेवेतून समाधान देऊन शासनाची प्रतिमा उंचावल्याबद्दल काझी यांना महसूल व वन विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी,निवासी उपजिल्हा अधिकारी डॉ.महेंद्रकुमार कांबळे आणि इतर अधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# सह्याद्री इंग्लिश स्कूलमध्ये ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील सह्याद्री इंग्लिश स्कूल मध्ये प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.आज 26 जाने.सह्याद्री इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज बाजार सावंगी येथे 75 वे प्रजासत्ताक दिन मोठा उत्साहात साजरे करण्यात आले. प्रकाश आबा नलावडे (तंटामुक्ती अध्यक्ष, बाजारसंगी) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर कवायत घेऊन,विद्यार्थ्यांनी भाषण, देशभक्ती पर गीत,नाटिका सादर केली.

या प्रसंगी ज्ञानेश्वर बापू नलावडे, युवराज नलावडे, तलाठी नारायण पट्टे,कैलास घुले, आनंदा काटकर,हरिभाऊ पुंड, रवींद्र साळुंके, गणेश नलावडे,पत्रकार पाटील सर, सचिन गवळी, विनोद नलावडे,शाळेचे मुख्याध्यापक योगेश कुचे,भूषण कुचे शाळेच्या सहशिक्षिका वैष्णवी कुचे, राजश्री अधिकार, प्रीती खंडागळे, पूनम नलावडे देविका चव्हाण भाग्यवंत मावशी, संतोष राऊत, भास्कर घुले यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमांची सांगता करण्यात आली.

# आदर्श पतसंस्था घोटाळा : बाजार सावंगी येथे धरणे आंदोलनाची तयारी सुरू



आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** आदर्श पतसंस्था घोटाळा या संदर्भात दि.२६ शुक्रवार रोजी रेणुका माता मंदिर परिसरात सर्व ठेवीदारांनी महत्वाची बैठक बोलवुन ३० रोजी होणाऱ्या धरणे आंदोलनासंदर्भात दिशा ठरवून सहकुटुंब धरणे आंदोलनात हजर राहण्याचा निर्धार करण्यात आला आहे. बाजार सावंगी येथील रेणुकामाता देवी मंदिर परिसरात बाजार सावंगी सह ताजनापूर रेल कनकशीळ दरेगाव व इतर गावांच्या ठेवीदारांनी उपस्थिती दर्शावून अनेकांनी आपले मनोगत पैसे अभावी त्रास पैसे अद्याप हाती न मिळाल्याने ठेवीदारांच्या कुटुंबीयांना होत असलेला त्रास तर पैसा अभावी कामे व्यवहार ठप्प एक ना अनेक समस्यांचा पाढा येथे वाचण्यात आला.ठेवीत गुंतलेले पैसे हाती कसे पडतील याची चिंता ठेवीदारांनी सतावत असुण ते सर्व परेशान आहे व पैसा मिळविण्यासाठी येत्या ३०रोजी पतसंस्था विरुध्द धरणे आंदोलन करण्याचा मानस असल्याने बाजार सावंगी येथे दि.२६ एक बैठक घेऊन ३०रोजी धरणे आंदोलनात सह कुटुंब उपस्थित राहणार असल्याचे निर्धार येथे करण्यात आला.



# प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**नेमिनाथ जैन**

**बोरी :** भारतीय स्वातंत्र्याच्या 75 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त बोरी येथे विविध शाळा, शासकीय कार्यालयात ध्वजारोहण, प्रभात फेरी, बक्षीस वितरण व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बोरी पोलीस ठाणे, ग्रामपंचायत कार्यालय, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी ,जिल्हा मध्यवर्ती बँक ,ओमप्रकाश देवडा बँक, जिल्हा परिषद प्रशाला, जिल्हा परिषद केंद्रीय कन्या शाळा ,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ,शकुंतलाबाई बोर्डीकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ,साईकृपा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ,ज्ञानोपासक विद्यालय, प्रिन्स इंग्लिश स्कूल ,बोरी कृषी उत्पन्न बाजार समिती आदी विविध ठिकाणी सकाळी ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर काही शाळात बक्षिस वितरण व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले साईकृपा विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा झाला, ध्वजरोहणासाठी प्रमुख अतिथी निर्मलाबाई अशोकरावजी चौधरी, अशोकरावजी चौधरी व सचिव मा. अजय भैय्या चौधरी, व प्रमुख पाहुणे. उपस्थित होते, शाळेच्या मुख्याध्यापिका अश्विनीताई चौधरी यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले व भारत स्वातंत्र्य लढ्यात बलिदान दिलेल्या क्रांतिकारकांचे, नेत्यांचे स्मरण करून त्यांनी सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

शाळेतील विद्यार्थ्यांनी भाषणे, देशभक्तीपर गीते सादर केले, शाळेतील शिक्षक वाघ सर यांनी प्रस्ताविकेतून भारताच्या उज्वल भविष्यासाठी आपण देशाचे आदर्श नागरिक होणे महत्त्वाचे आहे असा संदेश आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना दिला. प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेत वक्तृत्व, समूहगीत, देशभक्तीपर गीत अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. ज्या विद्यार्थ्यांनी खेळामध्ये प्राविण्य संपादन केले त्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रसस्तीपत्र देण्यात आले. शाळेतील शिक्षक शरद सरांनी आभार प्रदर्शन केले व इतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला.

# स्वत:मधील देशभक्त जागविण्याचा संकल्प करूया : सुधीर मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष आजपासून सुरू झाले आहे. संविधानाने आपल्याचा जसे अधिकार दिले, तसेच कर्तव्य आणि दायित्वाचीसुध्दा जाणीव करून दिली आहे. या देशासाठी प्राणाची आहुती देऊन स्वातंत्र्याचा मंगलकलश ज्यांनी आपल्या हाती दिला आहे, त्या शहिदांचे स्मरण करून देशाला व लोकशाहीला पुढे नेण्यासाठी स्वत:मधील देशभक्त जागविण्याचा संकल्प करूया, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. पोलिस मुख्यालय येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित मुख्य शासकीय कार्यक्रमात ध्वजारोहण करतांना ते बोलत होते. यावेळी आमदार सुधाकर अडबाले, किशोर जोरगेवार, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम. यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

भयमुक्त, भूकमुक्त, विषमतामुक्त भारत हा भाव



संविधानात आहे, असे सांगून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, सर्व व्यसनांपासून मुक्त होऊन अमृत कलश हातात घेण्याचा संकल्प करणे, हाच खरा प्रजासत्ताक दिन आहे. आपल्याकडे नुकत्याच राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे जिल्हा प्रशासनाने उत्कृष्ट नियोजन केले. त्यासाठी जिल्हाधिकारी व संपूर्ण प्रशासन अभिनंदनास पात्र आहे. अयोध्या येथे झालेल्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येला चंद्रपूरकरांनी 'सियावर रामचंद्र की जय' हा मंत्र लिहून एक आगळावेगळा विश्वविक्रम केला. त्याची गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉडमध्ये नोंद झाली आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात आता वाघांच्या संरक्षणासोबतच जटायूचे संवर्धन करण्यात येणार आहे. चंद्रपूर जिल्हा हा धान उत्पादक जिल्हा असून 1 लक्ष 84 हजार हेक्टरवर धानाची शेती केली जाते. राज्य सरकारने आता धानाचा बोनस वाढवून 20 हजार रुपये हेक्टरप्रमाणे दोन हेक्टरपर्यंत 40 हजार रुपये मंजूर केले आहे. ऐकार्जुना येथे 31 कोटी 90 लक्ष रुपयांत भाजीपाला संशोधन केंद्र उभे राहणार आहे. अजयपूर येथे पंजाब नॅशनल बँकेने 15 कोटी रुपये शेतीपयोगी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यासाठी उपलब्ध करून दिले आहे.


# जात धर्म बाजूला ठेवा : रामदास कांबळे

## संविधानाच्या संरक्षणासाठी सर्वांनी एकत्र या

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** जगातील सर्वश्रेष्ठ संविधान म्हणून भारताच्या संविधानाकडे पाहिले जाते. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या मेहनतीने हे संविधान लिहिले.अनेक देशातील संविधानाचा अभ्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केला.२ वर्ष ११ महिने १७ दिवसाच्या अथक परिश्रमानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी देशाला अर्पण केले.२६ जानेवारी १९५० साली संविधानाची अंमलबजावणी करण्यात आली.तेंव्हा पासून आजतागायत आपला देश हा लोकशाही प्रधान देश म्हणून ओळखु लागला.प्रजासत्ताक भारत म्हणून सर्व जाती धर्मातील लोक हे गुण्या गोविंदाने नांदत आहेत. स्वातंत्र्य,समता,बंधुता ही तत्वे संविधानाने रुजविली आहेत.हे संविधान आहे म्हणून तर आपल्याला हक्क आणि अधिकार मिळत आहेत. परंतु देशात संविधानाच्या विरोधात सुद्धा काही विकृत लोकं भूमिका घेत असतात.संविधानाच्या विरोधातलले कार्य सुद्धा जोमाने चालविले जात आहे.संविधानाला बगल देऊन जाती जातीत आणि धर्मा धर्मात तेढ निर्माण करण्याचे काम केले जात आहेत.यास अनेक जाती धर्मातील लोकं बळी पडत आहेत.द्वेष मत्सर लोकांच्यात निर्माण केले जात आहेत.परंतु संविधानाला हे मान्य नाही.जात धर्म बाजूला ठेवून आपण सर्वांनी संविधाना साठी एकत्र आले पाहिजे असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे सातारा जिल्हा समन्वयक व यशदा सामाजिक व शैक्षणिक विकास संस्था,लोणीचे संस्थापक अध्यक्ष रामदास कांबळे यांनी म्हटले.



संविधानाचा विचार हा घरा घरात जाऊन पोहचला पाहिजे.ज्या पद्धतीने हर घर तिरंगा हे अभियान राबविण्यात आले तसेच हर घर संविधान हे अभियान राबविण्याची गरज आहे.तिरंगा तर प्रत्येकाच्या घरात गेला परंतु संविधान सुद्धा घरा घरात घेऊन जाण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.देशातील प्रत्येक नागरिकाला हे संविधान समजले पाहिजे. यासाठी सुध्दा जनजागृती घडवून आणण्यासाठी विविध उपक्रम राबविले पाहिजेत.आपले हक्क आणि अधिकार काय आहेत.हे संविधान अभ्यासल्याशिवाय आपल्याला समजणार नाही. त्यामुळे संविधानाच्या अनुषंगाने काम करण्याची गरज निर्माण झालेली आहे.

क्रांतिकारकांचे बलीदान आणि हे आपले संविधान यामुळेंच देश आकाराला आलेला आहे.त्यामुळे क्रांतिकारकांचे बलिदान आणि संविधानाचे आपल्यासाठी दिलेले योगदान अजिबातच विसरता येणार नाही.असे सुद्धा रामदास कांबळे यांनी म्हटले.पुढे कांबळे म्हणाले की,देशाचे संविधान टिकून राहील तर आपले हक्क अधिकार अबाधित राहणार आहेत. संविधानाचे संरक्षण करणे ही काळाची गरज होऊन बसलेली आहे.संविधानाची जनजागृती करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. देशात मूळ प्रश्न भरकटविले जात आहेत. खाजगीकीकरण जोरदार पणे सुरू आहे. एकिकडे आरक्षण लढे सुरू असले तरी दुसरीकडे सरकारी नोकऱ्या कमी केल्या जात आहेत. बेरोजगारीचे प्रमाण वाढलेले आहे.हाताला कामधंदा नसल्याने अनेकांवर उपासमारीची वेळ येत आहे.आत्महत्या होऊ लागल्या आहेत.कोरोना काळात लोकांची कशी बिकट अवस्था झाली होती.हे सर्वांनीच पाहिलेले आहे.देशात संविधान असून सुद्धा संविधानाची अंमलबजावणी आणि संविधानाची जनजागृती होत नसल्याने आपल्या हक्क आणि अधिकारा साठी कसे लढले पाहिजे.

याची जाणीव लोकांमध्ये येत नाही.हे संविधान सुरक्षित अभ्यासले तरच आपल्याला लढता येईल. संविधान सुरक्षित राहील तरच आपण ही आपले हक्क आणि टिकवून ठेवू शकतो. संविधानाने सर्व जाती धर्माला संरक्षण मिळवून दिलेले आहे.त्यामुळे संविधान संरक्षणासाठी सुद्धा सर्वांनी एकत्र येण्याची वेळ आलेली आहे.जात आणि धर्म बाजूला ठेवून थोडं तरी संविधानासाठी झटूया असे सुद्धा रामदास कांबळे यांनी म्हटलेले आहे.

# वंदे भारत पश्चिम रेल्वेवर ताशी १६० किमीच्या वेगाने धावणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस पश्चिम रेल्वेवरील मिशन रफ्तार प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात येणार असून मिशन रफ्तारअंतर्गत मुंबई – सुरत – वडोदरा – दिल्ली आणि मुंबई – वडोदरा – अहमदाबाद या महत्त्वाच्या विभागांमध्ये रेल्वेगाड्या ताशी १६० किमी वेगाने धावणार आहेत. त्यामुळे लवकरच पश्चिम रेल्वेवरील पहिली मुंबई सेंट्रल – गांधीनगर वंदे भारत एक्स्प्रेस ताशी १६० किमी वेगाने धावण्यास सज्ज होणार आहे. मुंबई आणि अहमदाबाददरम्यानचा प्रवासाचा वेळ कमीत कमी ३० ते ५० मिनिटांनी कमी करण्याचा प्रयत्न आहे. तसेच मुंबई – दिल्ली दरम्यानच्या प्रवासाचा कालावधी कमी होणार आहे. भारतीय रेल्वेच्या प्रत्येक विभागात रेल्वेगाड्या ताशी १३० किमी वेगाने धावण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र पश्चिम रेल्वेने एक पाऊल पुढे टाकत रेल्वेगाड्याचा वेग ताशी १६० किमीने वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. पश्चिम रेल्वेच्या रुळाच्या दोन्ही बाजूने सुरक्षा भिंत उभारणे किंवा लोखंडी तारा लावणे सुरू आहे. यामुळे रेल्वे रूळ ओलांडण्याच्या घटना, गुरे रेल्वे मार्गावर येण्याच्या घटना रोखता येतील. मुंबई – अहमदाबाद या ६२२ किमी रेल्वे मार्गापैकी ५६२ किमी रेल्वे मार्गावर कुंपण उभारण्यात आले आहे. उर्वरित रेल्वे मार्गावर कुंपण उभारण्याचे काम लवकरच पूर्ण होईल. या कामासाठी एकूण २६४ कोटी रुपये खर्च आला आहे.



# कर्म. आ.मा.पाटील महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळनेर :** कर्म. आ.मा.पाटील कला, वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर महाविद्यालयात करिअर कट्टा अंतर्गत सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. के.डी.कदम हे होते. यावेळी विचार मंचावर करियर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. सतीश मस्के,प्रा. डॉ. बी. सी. मोरे व प्रा. डॉ. संजय खोडके आदी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. के.डी. कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेमध्ये भाग घेऊन आपले करिअर घडवायला हवे. व्यक्तिमत्व विकास सुधारायला हवा. त्याचबरोबर करिअर कट्टा याविषयी व त्यातील उपक्रमाविषयी माहिती प्रा. डॉ.सतीश मस्के यांनी दिली. यावेळी सामान्य ज्ञान स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचा निकालही जाहीर करण्यात आला. प्रथम क्रमांक गायकवाड अजय गुलाब, द्वितीय चेतना प्रवीण निकुम, तृतीय श्रुती संतोष वानखेडे व उत्तेजनार्थ कैलास दाजी सोनवणे हे उत्तीर्ण झाले. यावेळी प्राचार्य प्रा.के.डी. कदम, डॉ. सतीश मस्के, डॉ.संजय खोडके, डॉ. डब्ल्यू बी. शिरसाट व पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे सदस्य मा. रामचंद्र पुंडलिक भामरे आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# स्वर्गीय किसनराव सदार विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** खडकी सदार येथील स्वर्गीय किसनराव सदार विद्यालयांमध्ये प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व विद्यार्थी प्रारंगणामध्ये जमा झाली. नंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख पाहुणे व इतर मान्यवरांनी महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय सदार (स्वर्गीय किसनराव सदार विद्यालय) प्रमुख पाहुणे संदीप सदार (सचिव ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ.), प्रमुख मार्गदर्शक जाधव सर (मुख्याध्यापक स्वर्गीय किसनराव सदार विद्यालय खडकी सदार ), प्रमुख उपस्थितीमध्ये माधव सदार ,राजेश सदार ,आकाश सदार, पत्रकार शंकर सदार, शिवाजी सुरूशे, दत्तात्रय सदार, रतन सदार व इतर गावकरी मंडळी उपस्थित होती. विद्यालयाच्या वतीने सर्वांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमांमध्येच निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण तसेच शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धा याचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक जाधव सर म्हणाले की, भारताचे संविधान जगातील सर्वात उत्कृष्ट आहे संविधानामुळे सर्व धर्माचे ,पंथाचे ,लोक एकत्र राहतात ही आपल्या देशाची ताकद आहे चांगल्या शिक्षणाबरोबर चांगल्या मूल्याची संस्काराची जोड असणे गरजेचे आहे मूल्य शिक्षणाचे धडे आपण शाळेत गिरवत असतो याच मूल्य शिक्षणामुळे मुले घडतात व देशाला घडविण्यात मदत करतात .असे सरांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री संजू भाऊ सदार यांनी सुद्धा मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बकाल सर यांनी उत्कृष्टपणे केले. तसेच आभार प्रदर्शन श्री वायाळ सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी वाठोरे सर, फुपाटे सर, खडसे सर , मार्कड , कोरडे ,यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला अशा प्रकारे मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.






# पेंडेफळ येथे प्रजासत्ताक दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापुर :** तालुक्यातील पेंडेफळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि.26जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. शालेय समितीचे अध्यक्ष यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला होता. शाळेतील शिक्षकांनी काही संस्कृती कार्यक्रम आयोजित केले होते त्यामध्ये मुलामुलींना मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता. छोट्या छोट्या मुलांची भाषणं आणि गाणी गायली ते ऐकून गावातील ग्रामस्थांनी मुलामुलींचं कौतुक केले.त्यावेळी ग्रामस्थ व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ॲसेंड स्कूलचे स्नेहसंमेलन; चांडाळ चौकडीच्या कलाकारांचा होणार सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** निरा-पिंपरे ता.पुरंदर येथील ॲसेंड इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने ३० जानेवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आलेले आहे.या कार्यक्रमातून काही मान्यवरांना विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.अशी माहिती शाळेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे यांनी दिली.यावेळी चांडाळ चौकडी फेम असलेले भरत ऊर्फ बाळासाहेब शिंदे,आणि रामभाऊ जगताप या दोघांना मार्तंड कलारत्न पुरस्कार तसेच सुभाषराव मदने यांना मार्तंड निसर्गरत्न पुरस्कार देण्यात येणार आहे. हा पुरस्कार नागेवाडी येथील मोहनसिंह रजपूत महाराज यांच्या हस्ते दिला जाणार आहे.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सनदी अधिकारी संभाजीराव झेंडे हे असणार आहेत.तर प्रमुख पाहुणे म्हणून अधीक्षक कृषी अधिकारी स्मार्ट प्रकल्प पुणेचे वैभव तांबे येणार आहेत.तसेच कांबळेश्वरचे सचिन जगताप यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे,सचिव नीता खोमणे, मुख्याध्यापिका सुषमा भुंजे तसेच डायरेक्टर सुदर्शन जैन,संजय मदने,मिलिंद केंडे,विलास सकट,वृषाली रणधीर,तनुजा शहा,माजी सैनिक विठ्ठल झगडे आदींची उपस्थिती असणार आहे. त्यांच्या याच





कार्याची दखल घेणे हे आमची जबाबदारी असून त्यांना प्रेरणा देण्याचा तसेच विद्यार्थ्यांमध्ये कला गुण विकसित व्हावेत. हे आदर्श विद्यार्थ्यांच्या समोर घेऊन येण्याचा प्रयत्न करत आहे, असे सोमनाथ खोमणे यांनी म्हटले. दरवर्षी या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जात असते. विद्यार्थी यांचे वार्षिक स्नेह संमेलन हे कलाकारांच्या उपस्थितीत घेण्याचा नेहमी प्रयत्न असतो.याही वर्षी हे नियोजन केलेले असून या कार्यक्रमासाठी सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्याध्यापिका सुषमा भुंजे यांनी केलेले आहे.हा कार्यक्रम थोपटेवाडी येथे संपन्न होणार असून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेखा पाटोळे, यास्मिन सय्यद,नितीन दगडे, रुपाली शितोळे, मंजुश्री काटकर, आशालता काकडे, पुष्पा शिंदे, नितीन दगडे, अर्पणा फरांदे, दीपिका निगडे,माधुरी ठोंबरे, सुजाता जाधव,मनीषा धायगुडे, किशोरी थोपटे आदी शिक्षकवृंद व कर्मचारी वर्ग मेहनत घेत आहेत.

# धुळे तालुका हेच माझे कुटुंब : आ. कुणाल पाटील

## बाजार समितीत विकास कामांचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यात पक्षीय राजकारण बाजूला ठेवून विकासाची कामे करीत असतो. त्यामुळे आपल्याला सर्वच पक्षातील कार्यकर्ते विकासासाठी सहकार्य करीत असतात. म्हणून धुळे तालुक्यातील प्रत्येक माणूस हाच माझा पक्ष आहे आणि तालुका हेच माझे कुटुंब असल्याचे प्रतिपादन धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांनी आज धुळे बाजार समिती येथे आयोजित कार्यक्रमात केले. आ.पाटील यांच्या हस्ते बाजार समितीत व्यापारी गाळ्यांसह विविध कामांचे लोकार्पण आणि भूमीपुजन करण्यात आले.

धुळे कृषी उत्पन्न बाजार समिती येथे धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते विविध कामांचे लोकार्पण आणि भूमीपुजन आज दि.25 जानेवारी रोजी सकाळी 11 वा. करण्यात आले.धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने तीस व्यापारी गाळे आणि शुध्द पाणी मिळावे म्हणून आर.ओ.पाणी फिल्टर प्लँन्टचे लोकार्पण करण्यात आले तर गुरे बाजारातील दोन कॉंक्रीट रस्ते व भुमीगत गटारीचेही भूमीपुजन आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. उद्‌घाटनप्रसंगी बोलतांना आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, ज्या विचारांनी व उद्देशाने बाजार समितीची निवडणूक जिंकली त्यानुसारच आज येथे विकासाची कामे सुरु आहेत. बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अत्यंत कमी कालावधीत शेतकरी आणि व्यापाऱ्यांच्या सुविधेसाठी विविध कामे करुन विकासाची घोडदौड सुरु ठेवली आहे. तालुक्यात राजकारण करीत असतांना पक्ष बाजूला ठेवून विकासाची कामे करीत असतो. त्यामुळे धुळे तालुक्यातील प्रत्येक माणूसच माझा पक्ष असून तालुका हाच माझा परिवार असल्याचे आ.कुणाल पाटील यांनी शेवटी सांगितले. सभापती बाजीराव पाटील यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, बाजार समितीत कामकाज करीत असतांना सर्व संचालकांचे सहकार्य मिळत असते. बाजार समिती शेतकरी व व्यापारी,हमाल मापाडींना सेवा पूरविण्याचा पूरेपुर प्रयत्न करीत आहे. बाजार समितीची आर्थिक घडी बसून शिल्लक वाढविली आहे.येणाऱ्या काळात अव्वल दर्जाची बाजार समिती



करणार असल्याचे सभापती बाजीराव पाटील यांनी सांगितले. कार्यक्रमात उपसभापती योगेश पाटील, संचालक महादेव परदेशी यांनी मनोगत व्यक्त केले. लोकार्पण सोहळ्याला आ.कुणाल पाटील यांच्यासमवेत सभापती बाजीराव पाटील,जिल्हा उपनिबंधक मनोज चौधरी, संचालक गुलाबराव कोतेकर, साहेबराव खैरनार, खरेदी विक्रीचे चेअरमन लहू पाटील, ज्येष्ठ नेते प्रमोदभाऊ जैन, धुळे तालुका कॉंग्रेस अध्यक्ष डॉ.दरबारसिंग गिरासे, पं.स.चे माजी सदस्य पंढरीनाथ पाटील, पं.स.चे माजी सभापती भगवान गर्दे, जि.प.सदस्य अरुण पाटील, माजी संचालक राजेंद्र भदाणे, आप्पा खताळ, संतोष राजपूत, विशेष कार्यअधिकारी प्रकाश पाटील, बाजार समितीचे संचालक गंगाधर माळी, एन.डी.पाटील, विशाल सैंदाणे, रावसाहेब पाटील, महादेव परदेशी, विजय चिंचोले, संभाजी देवरे, ऋषीकेश ठाकरे, कुणाल पाटील, सौ.छायाताई पाटील, सौ.नयनाताई पाटील, विश्वास पाटील, सुरेश भिल, भागवत चितळकर,कृषीभूषण भिका पाटील, शिवाजी अहिरे, माजी सरपंच संतोष पाटील, बापू खैरनार,सागर पाटील, सोमनाथ पाटील,पं.स.सदस्या सुरेखाताई बडगुजर,माजी सदस्य छोटूभाऊ चौधरी, दुध संघाचे चेअरमन वसंत पाटील, सरपंच नागेश देवरे, युवक कॉंग्रेस अध्यक्ष गणेश गर्दे, गंगाराम कोळेकर,महिला कॉंग्रेस अध्यक्षा गायत्रीताई जयस्वाल, सौ.अर्चनाताई पाटील, हसण पाटील, हिरामण पाटील,सचिव देवेंद्र पाटील, विशाल आव्हाड, देवेंद्रसिंग सिसोदिया आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन माजी पं.स.सदस्य पंढरीनाथ पाटील यांनी केले तर आभार संचालक संभाजी राजपुत यांनी मानले.

# भारतीय प्रजासत्ताक वर्धापन दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७५ वा वर्धापन दिन शहरात विविध सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमानी शुक्रवार( ता,२५ )रोजी उत्साहात संपन्न झाला,मुख्य शासकीय समारोह जि,प,प्रशाला( मुलींची )येथे उपविभागीय अधिकारी डॉ,अरुण जऱ्हाड यांच्या हस्ते सकाळी सव्वा नऊ वाजता ध्वजारोहण झाले, राष्ट्रगीत झाल्यानंतर पोलीस अधिकारी पवनसिंह राजपूत यानी मांवनदाना दिली ,याठिकाणी तहसीलदार सुनील सावंत, पालिका प्रशासक भागवत बिघोत राजपूत,पो,नि, श्याम सुंदर कौठाळे, ना,तहसीलदार किरण कुलकर्णी,ऍड,रमेश सावंत, जेष्ठ नागरिक रवींद्र आप्पा साखरे, धोंडीरामसिंह राजपूत,कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक प्रशांत त्रिभुवन, एस.के. पगार, शाहीर अशोक बागुल, अशोक आप्पा पवार, मंडळ अधिकारी गजानन जाधव, कहाटे, जऱ्हाड, रय्यस चाऊस ,मकरंद कुलकर्णी, अजयसिंह राजपूत यांच्यासह नागरिक, महिला, शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध शाळांनी राष्ट्रीय, मातृभूमी, गीते,नृत्य,व भाषणे सादर केली. शिक्षक निकाळे, वाघ, सूर्यवंशी, श्रीमती दह्याटे, श्रीमती भोये व विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत नंतर महाराष्ट्र गीत,संविधान वाचन, व तंबाखू नियंत्रण शपथ ही दिली,साहित्य कवायत श्री निकाळे व श्री सुरडकर यांनी सादर मन जिंकली, ग्लोबल देवगिरी, आरोहन अकॅडमी, या इंग्लिश माध्यम शाळांनी भारताची विविधतेत एकता दर्शविणारे गीते व नृत्य सादर केले. श्री स्वामी समर्थ विद्यालय,जि,प,प्रशाळा मुलींची,कैलास पाटील विद्यालय,छत्रपती शाहू विद्यालय च्या सर्व शिक्षकानी सहभाग नोंदविला,या कार्यक्रमाचे सूत्र संचलन माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. तहशिल कार्यालयात तहसीलदार सुनिल सावंत, पालिकेत प्रशासक भागवत बिघोत यांनी ध्वजारोहण केले.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, साबेरखान, दशरथ बनकर,डॉ,निलेश भाटिया,शैलेश चव्हाण,ज्ञानेश्वर टेके,हाजी इम्रान कुरेशी,मजीद कुरेशी,सखाहरी बर्डे,बबन त्रिभुवन,डॉ,प्रीती भोपळे, प्रमोद निकाळे, रमेश त्रिभुवन स्वातंत्र्य सैनिक कुटुंबीय कमलबाई लोंढे, गोदाबाई राजपूत, उघडे, रहाणे,राजेश गायकवाड, दिनेश राजपूत डॉ. व्ही. जि. शिंदे,प्राचार्य डॉ,वसंतराव ठोंबरे,उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय उप अधीक्षक डॉ. मुंढे, हुतात्मा जगन्नाथ भालेराव स्मारक येथे श्रीमती लक्ष्मीबाई जयराम,भोसले, तर विविध कार्यालयात कार्यालय प्रमुख यांनी ध्वजरोहन केले.



# राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त जांब येथे क्रिकेट सामन्याचे उद्‌घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील जांब येथे भगवान बाबा युवक क्रीडा मंडळ जांब यांच्या वतीने राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त क्रिकेटच्या सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर सामन्याचे उदघाटन महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस सचिव सुरेश भैय्या नागरे यांच्या हस्ते करण्यात आले. कॉंग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष नानासाहेब राऊत, जिल्हा परिषद सदस्य अविनाश काळे, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र नागरे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस उपाध्यक्ष केशवराव बुधवंत,युवक कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष अभय कुंडगीर, सरपंच योगेश बुधवंत, युवक कॉंग्रेस युवक अध्यक्ष राम घुगे, तहसीन देशमुख,महेश सांगळे, राहुल कुटे, पप्पू टाकरस, आसाराम बुधवंत, चेअरमन संभाजीराव बुधवंत, गजानन पालवे, बलवान राठोड, गोपाल बुधवंत,अशोक थिटे, प्रसाद बुधवंत,सुधाकर दराडे, योगेश कंठाळे, कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# वेरूळ येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वेरूळ येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे 75 वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री सतीश देवेंद्र लोखंडे यांनी ध्वजारोहण केले तर वेरूळ येथील प्रतिष्ठित नागरिक माजी प्राध्यापक रामदास पाटील यांनी ध्वज पूजन केले. प्रमुख पाहुणे म्हणून सहायक पोलीस निरीक्षक सलीम शेख गणी यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सतीश लोखंडे आणि रामदास पाटील यांच्या हस्ते विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना वही आणि पेनाचे बक्षीस तसेच रोख स्वरूपातील बक्षीस वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भाषण आणि देशभक्तीपर गीते सादर केली. तर काही विद्यार्थ्यांनी इंग्लिश मधून भाषणे केली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

यावेळी ग्रामपंचायत सरपंच सौ कुसुमताई प्रकाश पाटील, उपसरपंच विजय राठोड, सोसायटी चेअरमन मुलचंद चव्हाण, ग्रा.पं.सदस्य चंदू राठोड, जयलाल सुलाने, जितेंद्रसिंग हजारी, प्रकाश पाटील,साहेबराव पांडव, नामदेव बकाल, हंसराज चव्हाण, रियाज शेख, श्रीकांत भालेराव,रफिक शेख, उपाध्यक्षा सविता घोडके, फराना शेख, अनिता बनकर, असिफ शेख, राहुल थोरात, ग्रामविकास अधिकारी स्वप्निल घडामोडे, मंडळाधिकारी कुलकर्णी मॅडम, कृषी सहाय्यक विजय सोनवणे, मुख्याध्यापक सुरेश बोरसे, पोलीस पाटील रमेश ढीवरे,यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# अ. ज. राजूरकर यांच्या जन्मस्थळी वरोऱ्यात चंद्रपूरचे इतिहासकार गौरवग्रंथाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 500 वर्षाचा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या चंद्रपूर शहराचा इतिहास ज्यांनी लिहून ठेवलाय असे चंद्रपुरातील इतिहासकार अ. ज. राजूरकर यांचं हे जन्मशताब्दी वर्ष. त्या अनुषंगाने २७ जानेवारी २०२४ हे चंद्रपूरचे इतिहासकार अण्णाजी जयराम राजूरकर यांचे जन्म दिवसाचे औचित्य साधत इतिहासकार अ. ज.राजूरकर स्मृती प्रतिष्ठान,चंद्रपूर आणि इतिहास विभाग, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांचा जन्मशताब्दी समारोह काल २५ जानेवारी २०२४ या दिवशी लोकमान्य महाविद्यालयाच्या अंतरक्रिडागृहात पार पडला. या समारोहात अ. ज.राजूरकर स्मृती प्रतिष्ठान च्या वतीने 'चंद्रपूरचे इतिहासकार' या इतिहासकार राजूरकर यांच्यावरील गौरवग्रंथाचे विमोचन प्रा. श्रीकांत पाटील यांच्या हस्ते झाले तसेच 'चंद्रपूरच्या इतिहासाचे संवर्धन आणि संशोधनःदशा आणि दिशा' या विषयावर चंद्रपूरच्या इतिहासाचे अभ्यासक आणि संशोधक अमित भगत,मुंबई यांचे व्याख्यान झाले आहे.

अमित भगत यांनी चंद्रपूरचे ऐतिहासिक वैभव सांगत हा समृद्ध इतिहास संवर्धित करण्यासाठी स्थानिक लोकांच्या असलेल्या अनास्थेवर चिंता व्यक्त केली आणि आपल्या जिल्ह्याचे ऐतिहासिक महत्त्व जपण्यासाठी श्रोत्यांना प्रेरित केले. इतिहास आणि इतिहासकार यांचा सन्मान समाजाकडून होण्याची गरज आहे असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

समारोपाच्या स्वागताध्यक्ष लोकमान्य महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्य डॉ.जयश्री शास्त्री यांनी इतिहास क्षेत्रात काम करणाऱ्या तरुण अभ्यासक आणि संशोधकांची उदाहरणे देत त्यांच्या कामाने इतिहास क्षेत्रातील भविष्य उज्वल असल्याचे मत व्यक्त केले.

या सोहळ्याच्या अध्यक्षीय समारोपावेळी प्रा. श्रीकांत पाटील यांनी वरोऱ्याचा इतिहासातील अनेक मुद्दे श्रोत्यांसमोर मांडले आणि पुढे होणाऱ्या इतिहास लेखनाबद्दल आशावाद व्यक्त केला.

प्रास्ताविक इतिहासकार अ. ज.राजूरकर स्मृती प्रतिष्ठानच्या आयोजक डॉ. पल्लवी ताजने यांनी विस्तृतपणे प्रतिष्ठानची भूमिका, उद्देश आणि भविष्यकालीन योजना सांगितल्या. कार्यक्रमाचे संचालन लोकमान्य महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख डॉ. दीपक लोणकर यांनी केले.तर आभार डॉ रवींद्र शेंडे यांनी मानले.





# सायकल रॅलीतून मतदार जनजागृत

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** निवडणुक हा लोकशाहीचा केंद्रबिंदू आहे. राज्यघटनेने आपल्याला मतदानाचा अधिकार दिला आहे. हा अधिकार सर्वांनी निर्भीडपणे बजावून कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता आगामी निवडणुकीत मतदान करावे. सुदृढ लोकशाहीसाठी मतदार जागरूक असणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त लोकशाहीत मतदानाच्या अधिकाराबद्दल नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी जिल्हा प्रशासन,जिल्हा परिषद व चंद्रपूर महानगरपालिकेद्वारे राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालय ते मनपा पार्किंग स्थळ पर्यंत सायकल रॅली काढण्यात आली.समारोपीय कार्यक्रम मनपा पार्किंग प्रांगणात पार पडला. याप्रसंगी बोलतांना जिल्हाधिकारी यांनी सांगितले कि कालच चंद्रपूर जिल्ह्यातील मतदारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.१७ लक्ष ८२ हजार ३१६ मतदार आपल्या जिल्ह्यात आहेत. मतदानाच्या हक्कानेच समाजात सकारात्मक बदल घडविणे शक्य असल्याने सर्वांनी मतदानाचा हक्क बजविण्याचे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी जिल्हाधिकारी यांनी व उपस्थित सर्वांनी राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त प्रतिज्ञेचे वाचन केले.कार्यक्रमास जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विवेक जॉन्सन,पोलीस अधीक्षक श्री. रवींद्रसिंह परदेशी,महानगरपालिका आयुक्त श्री.विपिन पालीवाल, सहायक जिल्हाधीकारी श्री. मुरुगानाथन,तहसीलदार श्री.विजय पवार,अतिरिक्त आयुक्त श्री. चंदन पाटील,उपायुक्त श्री.मंगेश खवले तसेच मनपा अधिकारी कर्मचारी उपस्थीत होते.

# नाशिकमध्ये अमली पदार्थाची विक्री

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** चुंचाळे औद्योगिक परिसरात एमडी या अमली पदार्थाची विक्री करणाऱ्यास अंबड पोलिसांनी पाच संशयितांसह ताब्यात घेत त्यांच्याकडून तीन लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.
मुंबई येथील साकीनाका पोलिसांनी शिंदे गावात धडक देत भुषण पाटील आणि त्याच्या सहकाऱ्यांनी सुरू केलेला एमडी कारखाना काही महिन्यांपूर्वी उदध्वस्त केला. यानंतर शहर पोलिसांनी सोलापूरसह अन्य ठिकाणी छापे टाकत अमली पदार्थ खरेदी-विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली. अमली पदार्थांची खरेदी-विक्री करणाऱ्यांविरोधात कारवाईचे सत्र चालूच असून अंबड येथील एक्स्लो पॉइंटजवळ मुंब्रा येथून एक संशयित एमडी या अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी येत असल्याची माहिती अंबड पोलिसांना मिळाली.या माहितीच्या आधारे पोलिसांनी पथकातील अधिकारी, कर्मचारी यांच्यासह दोन पंचाना सूचना केल्या. संशयित मुस्ताक शेख उर्फ भुऱ्या हा काही जणांबरोबर बोलतांना दिसला. एक पाकीट घेऊन एकजण त्यास पैसे देतांना दिसताच तपास पथकाने छापा टाकत पाकीट ताब्यात घेतले. तपासणी केली असता २७.५ ग्रॅम वजनाचा एमडी अमली पदार्थ आणि रोख रक्कम असा तीन लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा परिसरातून मुस्ताक शेख उर्फ भुऱ्या हा एमडी अमली पदार्थ विकण्यासाठी नाशिक येथील चुंचाळे परिसरात आला होता. त्याच्याकडून अमली पदार्थाची खरेदी करतांना अन्य चार संशयितही अंबड पोलिसांनी ताब्यात घेतले. परंतु, पोलिसांनी मुख्य सूत्रधारापर्यंत पोहचण्यासाठी अन्य संशयितांची नावे जाहीर केली नाहीत.




# मतदार नोंदणी जनजागृती रॅलीमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** लोकसभा आणि विधानसभा निवडनूकीची तयारी शासकीय पातळीवर सुरू झाली आहे . याचाच एक भाग म्हणून निवडणूक प्रक्रियेमध्ये तरुणांचा सहभाग वाढावा व मतदार नोंदणीत वाढ व्हावी आणि मतदानाचा टक्का वाढवा यासाठी जिल्हा निवडणूक कार्यालयातर्फे विविध उपक्रम घेण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून मतदार नोंदणी विषय तसेच निवडणूक विषयक जनजागृती करण्यासंबंधाने जिल्हा निवडणूक कार्यालय नागपूर व वर्शिप फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 25 जानेवारी 2024 रोजी सकाळी 7:30 वाजता विद्यार्थ्यांच्या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था द्वारा संचालित रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
सदर रॅलीसाठी विद्यार्थ्यांना संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. मारोती वाघ, संस्थेच्या संचालिका सौ. लता वाघ, प्रभारी प्राचार्या डॉ. अर्चना काहाळे पत्की आणि महाविद्यालयाचे नोडल अधिकारी प्रा. सायली लाखे पिदळी यांचे मार्गदर्शन लाभले. यातून विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रिया संदर्भात बरीच माहिती मिळाली . निवडणूक व मतदान यासंदर्भात जाणीव जागृती व्हावी म्हणून विविध फलक हातात घेऊन विद्यार्थ्यांनि या रॅलीत आपला सहभाग नोंदविला .

# सुदृढ लोकशाहीसाठी मतदार जागरूक असणे आवश्यक : विनय गौडा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** निवडणूक हा लोकशाहीचा केंद्रबिंदू आहे. राज्यघटनेने आपल्याला मतदानाचा अधिकार दिला आहे. हा अधिकार सर्वांनी निर्भीडपणे बजावून कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता आगामी निवडणुकीत मतदान करावे. सुदृढ लोकशाहीसाठी मतदार जागरूक असणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी व्यक्त केले.
नियोजन सभागृह येथे राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., अपर पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, तहसीलदार विजय पवार, प्रभारी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) अतुल जताळे, पॅरा ऑलंपिकमध्ये सूवर्ण पदक विजेते व निवडणूक विभागाचे ब्रॅन्ड ॲम्बेसेडर नईमुद्दीन शेख उपस्थित होते. नथिंग लाईक व्होटिंग, आय व्होट फॉर शुअर' हे यावेळेसच्या मतदार दिनाचे घोषवाक्य आहे, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे 1 जानेवारी 2024 या अर्हता दिनांकावर आधारीत ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत जिल्ह्यात संक्षिप्त मतदान पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला. अर्हता दिनांक 1 जानेवारीप्रमाणेच आता वर्षभर 1 एप्रिल, 1 जुलै आणि 1 ऑक्टोबर या तारखेपर्यंतसुध्दा मतदार यादीत नाव नोंदणी करता येते. लोकशाही प्रक्रियेमध्ये मतदानाला सर्वात जास्त महत्व आहे. त्यासाठी आपले नाव मतदार यादीमध्ये असणे आवश्यक असून आपले नाव अचूक आहे का, यासाठी मतदारांनी यादी तपासून घ्यावी. निःपक्ष आणि मुक्त वातावरणात निवडणूका पार पाडणे ही सर्वांची जबाबदारी आहे. कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता सद्सद् विवेक बुध्दी वापरून नागरिकांनी मतदान करावे. आपला हक्क अतिशय पारदर्शकपणे वापरला तरच देश मजबूत होईल.



# परतूर-मंठा विधानसभा कक्ष प्रमुखपदी कैलास चव्हाण यांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, मा. खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिवसेना विभागीय नेते अर्जुन भाऊ खोतकर सूचनेनुसार बंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या परतूर मंठा विधानसभा कक्ष प्रमुख या पदासाठी शिवसेना जिल्हा प्रमुख मोहन अग्रवाल यांच्या शिफारस नुसार कैलास चव्हाण ची निवड करण्यात येत आहे.
शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून आपण गोर-गरीब, गरजू आणि आर्थिक दुर्बल घटकांतील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयांत राखीव खाटा उपलब्ध करुन देणे, निकषात बसत असलेल्या गरीब रुग्णांवर पूर्णतः मोफत किंवा सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करण्यासंदर्भातील मदत तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत नोंदणी असलेल्या रुग्णालयांमध्ये गरजू रुग्णांनाच) शस्त्रक्रिया मोफत करणे संदर्भात योग्य मार्गदर्शनासाठी सदैव तत्पर रहावे.
गंभीर-महागड्या शस्त्रक्रिया करावयाच्या असलेल्या गोरगरीब गरजू रुग्णांना भरीव प्रमाणात अर्थ सहाय्य व्हावे याकरीता पंतप्रधान वैद्यकीय सहाय्यता निधी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, श्री. सिध्दिविनायक ट्रस्ट, टाटा ट्रस्ट यांसारख्या विविध ट्रस्टच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी मिप्रयत्न शिल राहील या निवडबद्दल सर्व शिवसैनिक कडून पुढील वाटचाळीस शुभेच्या देण्यात आल्या मंगेशजी चिवटे विशेष कार्यकारी अधिकारी, रामहरी भिमराव राऊत कक्षप्रमुख शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष (महाराष्ट्र राज्य)ज्ञानेश्वर धुळगंडे सहकक्षप्रमुख शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष (महाराष्ट्र राज्य)शिवसेना विभागीय नेते अर्जुन भाऊ खोतकर,शिवसेना जिल्हा प्रमुख मोहन अग्रवाल,शिवसेना तालुका प्रमुख अमोल सुरुंग ,युवा सेना तालुका प्रमुख अविनाश



कापसे,उपतालुकाप्रमुख सोपान कातारे, उपतालुकाप्रमूख नितीन राठोड, विभागप्रमुख गजानन आकत, विभाग प्रमुख अंगद खरात, महादेव वीर अल्पसंख्यांक प्रमुख शेख खाजा शेख चाँद, दलित आघाडी राहुल भदर्गे शिवसेना उप शहर प्रमुख कैलास पुरी, शिवाजी तरवटे, बाबासाहेब चीखले, गिरी महाराज, शहर प्रमुख दीपक हिवाळे, कैलास ढवळे, मिथुन चव्हाण, सरपंच शेडगे,यांची उपस्थित होते.

# पाचही व्याघ्र संवर्धन प्रकल्पांचा एकत्रित पर्यटन आराखडा

## वनमंत्री सुधीर मुनगंटीवार : वनामृत होणार आता वन विभागाचा ब्रॅण्ड

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील व्याघ्र संवर्धन प्रकल्प हे आपले वैभव आहेत. हे वैभव जगापुढे येणे आणि पर्यटकांना त्याठिकाणी आकर्षित करण्यासाठी या सर्व व्याघ्रप्रकल्पांच्या सोईसुविधांमध्ये एकसूत्रता आणणे गरजेचे आहे. त्यासाठी पाचही व्याघ्र प्रकल्पांचा एकत्रित पर्यटन आराखडा तयार करावा, असे निर्देश वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. त्याचप्रमाणे वन विभागामार्फत उत्पादित वस्तूंसाठी यापुढे "वनामृत" हा एकच ब्रँड वापरण्याचा निर्णयही सुधीर मुनगंटीवार यांनी आज जाहिर केला.

राज्यातील व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानच्या नियामक मंडळाची बैठक आज सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. वन विभागाचे प्रधान सचिव बी. वेणूगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक शैलेश टेंभुर्णीकर आणि महिप गुप्ता यांच्यासह ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, पेंच-बोर व्याघ्र प्रकल्प, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, आणि नवेगाव – नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रसंचालक, इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, पाचही व्याघ्र प्रकल्पाचा पाच वर्षासाठी एकत्रित पर्यटन आराखडा तयार करण्यात यावा. एखाद्या व्याघ्र प्रकल्पात अभिनव उपक्रम राबविले गेले असतील तर त्याची इतर ठिकाणी अंमलबजावणी करता येईल का, याचा विचार व्हावा. व्याघ्र प्रकल्पात वन्यजीवांची संख्या वाढण्याच्या दृष्टीने अनुकूल वातावरण त्याठिकाणी राहील, हे पाहावे, अशा सूचना त्यांनी केल्या.

राज्यातील व्याघ्र प्रकल्पांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी चांगल्या सुविधा, सेल्फी पॉईंटसची निर्मिती करावी. तेथील परिसरातील गावातील घरांच्या भिंतीवर वन्यजीव आणि पर्यावरणपूरक चित्रे रंगवून अधिकाधिक वातावरणनिर्मिती करावी. स्थानिक नागरिकांना रोजगारनिर्मितीसाठी कौशल्य विकास विभागाच्या सहकार्याने प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, येथील महिला- युवक यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळेल, यासाठी प्रयत्न करणे, व्याघ्र प्रकल्पाद्वारे निर्मित वस्तूंचे योग्य ब्रँडींग होईल, त्यामध्ये एकसमानता असेल, याकडे लक्ष देण्याची सूचना त्यांनी केली.

या प्रकल्पातील बांबू झाडांच्या फुलोऱ्याचे व्यवस्थापन करणे, बीज साठवण, अग्नी संरक्षण या बाबींकडे अधिक गंभीरतेने लक्ष देण्याची



आवश्यकता असल्याचे सांगून मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले की, प्रत्येक व्याघ्र प्रकल्पाने त्यांची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी क्युआर कोड तयार करावा. ज्याठिकाणी नदी, तलाव आहेत, तेथे हाऊसबोट सारखी संकल्पना राबवावी.

पाचही व्याघ्र संवर्धन प्रकल्पात वंदे मातरम वनसेवा केंद्र सुरु करण्यात यावे. ज्याप्रमाणे आपले सरकार सेवा केंद्रांवर राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळते, त्याप्रमाणे वन विभागाच्या योजनांची माहिती आणि सेवा या केंद्रातून सुरु करण्याचे निर्देशही मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिले.

विविध व्याघ्र प्रकल्पात अभिनव उपक्रम राबवले जात आहेत. ते त्याच प्रकल्पापुरते मर्यादीत न राहता त्याची अंमलबजावणी इतरही प्रकल्पात करण्यात यावी, यासाठी एक समिती नेमून त्याआधारे अभ्यास करुन एका महिन्यात त्यासंबंधी कार्य अहवाल सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

सध्या सर्व व्याघ्र प्रकल्पांना त्यांच्या कामाबद्दल केंद्रीय यंत्रणेने अधिक चांगला शेरा दिला आहे. हा शेरा कायम उत्कृष्ट राहील, यासाठी सर्वांनी काम करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

वन विभागामार्फत उत्पादित वस्तूंची आता वनामृत या एकाच ब्रॅण्डनेमद्वारे प्रसिद्धी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. विविध व्याघ्र प्रकल्पात वस्तू / उत्पादन निर्मित होत असले तरी ते जगभर एकाच नावाने ओळखले जावे, यादृष्टीने प्रयत्न करावेत, अशी सूचना मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी केली.

यावेळी व्याघ्र प्रकल्पांच्या सर्व क्षेत्रसंचालकांनी सादरीकरण करुन त्याठिकाणी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.



# आ. फारुख शाह यांच्या हस्ते पहिल्या पदचारी पुलाचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहर विधानसभा मतदारसंघात नाविन्यपूर्ण कामांचा धडाका आ.फारुख शाह यांनी लावला आहे.मोठ्या शहरांच्या धरतीवर धुळ्यात देखील वाहतुकीच्या वर्दळीमुळे उड्डाणपूल आणि पदचारीपुलाची नितांत गरज भासत आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या जिजामाता विद्यालय, कमलाबाई गर्ल्सस्कुल आणि बाफना शाळेच्या विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना मोठी कसरत करावी लागत होती.तसेच यापरिसरात प्रमुख प्रशासकीय कार्यालये असल्याने सातत्याने वाहतूक कोंडी होत होती.यावर उपाययोजना करण्यासाठी कमलाबाई गर्ल्सस्कुल ते बाफना शाळेपर्यंत पादचारी पुल करण्यात आला आहे. शालेय कालावधीत जिजामाता हायस्कूल,कमलाबाई गर्ल्सस्कुल आणि बाफना शाळेच्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना रस्ताओलांडताना कसरत करावी लागत होती.विद्यार्थिनींची संख्या मोठ्याप्रमाणात असल्याने वाहतुकीचा खोळंबा ही नित्याचीच बाब झाली होती. यासंदर्भात जिजामाता हायस्कूल, कमलाबाई गर्ल्सस्कुल आणि बाफना शाळेच्या विद्यार्थिनींच्या पालकांनी आणि मुख्याध्यापकांनी आ.फारुख शाह यांचेकडे याठिकाणी पदचारी पुल उभारण्यात यावा अशी मागणी केली होती.त्यानुसार आमदार स्थानिक विकास निधीतून सुमारे ८० लक्ष खर्चातून पदचारी पुलाची उभारणी करण्यात आली आहे.आ.फारुख शाह यांचे शुभहस्ते पदचारी पुलाचे लोकार्पण करण्यात आले.याप्रसंगी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे,उपाध्यक्ष अतुल पाटील,कमलाबाई गर्ल्सस्कुलच्या मुख्याध्यापिका सौ.मनीषा जोशी, बाफना शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.आशा भामरे, बाफना संस्थेच्या सदस्या सौ.साधना मानेकर, डॉ. दिपश्री नाईक, सुलोचना अग्रवाल,रवींद्र इंगळे, चंद्रशेखर पाटील, नगरसेवक नासिर पठाण, नगरसेवक सईद बेग,नगरसेवक गणी डॉलर, नगरसेवक आमिर पठाण,प्यारेलाल पिंजारी,निजाम सैय्यद,इकबाल शाह, कैसर अहमद,डॉ. शराफत अली,वाकळे सर,डॉ. बापुराव पवार,फातेमा अन्सारी, हलीम शमसुद्दिन, मलेका खाटीक, अकेला आसिफ,शायेदा अन्सारी, रिझवाना शेख,सलमान खान, नजर पठाण,फैसल अन्सारी ,समीर मिर्झा यांच्यासह पालक,शिक्षक यांची प्रमुख उपस्थिती होती.

# अखेर टाकळी राजेराय ते देवळाना बु. रस्ते कामाला मिळाला मुहूर्त

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** टाकळी राजेराय मुख्य रस्ता ते देवळाना बुद्रुक या गावांसाठी रस्त्यासाठी नागरिक शेतकरी पदाधिकारी कित्तेक वर्षांपासून रस्ता करा म्हणुन मागणी करत आहे. आखेर त्यारस्त्या कामाला मुहूर्त मिळाले असुण जेसीबीद्वारे रस्त्या कामाला सुरुवात झाली आहे. पुर्वी हा रस्ता पाणंद रस्ता होता टाकळी राजेराय मुख्य रस्ता ते देवळाना बुद्रुक पर्यंत नाल्याद्वारे हा पाणंद रस्ता जात होता या रस्त्यावर ये जा करणे म्हणजे तारेवरची कसरत ठरत होती.फक्त हिवाळा उन्हाळ्यात हा रस्ता सुरू रहात होता पावसाळ्यात हा रस्ता बंदच पडून रहात असे यासंदर्भात माध्यमांनी सतत बातम्या द्वारे शासनाकडे व प्रशासनाकडे पाठपुरावा करत राहिल्या ने आखेर शासन प्रशासनाला मुहूर्त मिळालेच व टाकळी राजेराय मुख्य रस्ता ते देवळाना बुद्रुकपर्यंत जेसीबीद्वारे मातीकरण रस्ता करण्यात आला असुन पुढे तातडीने खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण काम करण्यात येणार असल्याने नागरिक शेतकऱ्यांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.



# क्रीडा संकुल येथे मतदार दिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे 25 जानेवारी 2024 रोजी क्रीडा संकुल कन्नड या ठिकाणी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला .सदर कार्यक्रमासाठी कन्नड तालुक्याचे मतदान नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संतोष गोरड व तसेच सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार कन्नड विद्याचरण कडवकर उपस्थित होते . उपस्थितीत शहरातील सर्व जिल्हा परिषद व खाजगी शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांना राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्व,मतदानाचे महत्व समजावून सांगितले. सर्व उपस्थितांना राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शपथ देण्यात आली.

तसेच उपस्थित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना EVM VVPAT बाबत ची माहिती दिली. या निमित्ताने प्रातिनिधिक स्वरूपात मतदान कार्डचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमासाठी निवडणूक विभागाचे प्रभाकर मनगटे , चंद्रशेखर सौंदाणकर , भगवान शिसोदे अ. का व शहरातील BLO व पर्यवेक्षक हजर होते.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# रासेयोतून सामाजिक बांधिलकीचे मूल्य रुजते

## डॉ. सोमिनाथ खाडे : राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष सातदिवसीय शिबीर

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** येथील गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष सातदिवसीय शिबीर मौजे कैलाशनगर, ता. अंबड, जि.जालना येथे दि. २१ जानेवारी ते २७ जानेवारीदरम्यान संपन्न होत आहे. युवकांचा ध्यास - ग्राम शहर विकास हे ब्रीद वाक्य घेऊनसुरू झालेल्या या शिबिराचा आजचा उद्घाटन सोहळा मान्यवरांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगीडॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरचे जालना जिल्हा रासेयो समन्वयक डॉ. सोमिनाथ खाडे हे उद्घाटक पाहुणे म्हणूनउपस्थित होते. सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाबासाहेब पवार, कैलाशनगरचे उपसरपंच प्रशांत पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमापूजनाने झाली. रासेयो शिबिराचे उद्घाटन करताना डॉ. सोमिनाथ खाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटलेकी, "राष्ट्रीय सेवा योजनाही विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभाव, सामाजिक समरसता आणि बंधुभाव निर्माण करण्यात मदत करते. महाविद्यालयात शिक्षण घेत असताना क्रमिक शिक्षण आणि सामाजिक मूल्यशिक्षण यांची योग्य सांगड घालण्याचे काम रासेयो करते. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिकता, मूल्यशिक्षण, आदरभाव आणि शिक्षणासोबतच सभोवतालचे वातावरण समजून घेण्याची दृष्टी विकसित करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते. आधुनिक काळामध्ये माणसे अधिकाधिक संकुचित होत जात असल्याचा अनुभव आपण प्रत्येक जण घेत असतो, परंतु जे विद्यार्थी महाविद्यालयीन जीवनामध्ये राष्ट्रीय शिबिरात सहभागी होतात ते विद्यार्थी आयुष्यभर सामाजिक मूल्यभान जपण्याचा निश्चितच प्रयत्न करतात. महाराष्ट्र ही संतांची, समाज सुधारकांची भूमी आहे असे आपण म्हणतो. या सर्व समाज सुधारकांनी परोपकार हा गुण समाजमनावर रुजविण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून नॉट मी बट यु हे ब्रीदवाक्य घेऊन रासेयो समाजामध्ये सातत्याने काम करते. आपण विशिष्ट दिवस शिबिरात सहभागी होतो म्हणजे तेवढेच दिवस आपण फक्त सामाजिक काम करावे असा त्याचा हेतू नाही. तर या शिबिरामधून आपल्या मनाची जडणघडण व्हावी, आपण कार्य करायला



तयार व्हावेत यासाठीची ही महाविद्यालय स्तरावरील कार्यशाळा होय, असे म्हटले तरी वावगे ठरू नये. तेव्हा विद्यार्थ्यांनी या माध्यमातून शिक्षणासोबतच समाज, मानवी मूल्य आणि राष्ट्रनिष्ठा या गोष्टी आत्मसात कराव्यात, असे प्रतिपादन उद्घाटक डॉ. सोमीनाथ खाडे यांनी याप्रसंगी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. ते आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की, महाराष्ट्रातील विविध गावे प्रत्येक महाविद्यालयाने दत्तक म्हणून घेतले. या पाठीमागे निश्चितच विकासाची एक भूमिका आहे. दरवर्षी नवीन गावात जाऊन काम करण्यापेक्षा एकाच गावात सातत्याने काही वर्षेरासेयोच्या माध्यमातून काम केल्यास काही एक रचनात्मक कार्य आपणास दिसून येईल. कैलास नगर, वसंत नगर आणि ईश्वर नगर या ग्रुप ग्रामपंचायतीच्या गावामध्ये आपण मागील काही वर्षापासून निश्चितच काम केलेले आहे. इथल्या स्वच्छतेचा प्रश्न असेल, सांडपाण्याचा प्रश्न असेल, जनजागृतीचा प्रश्न असेल किंवा शासनाची झाडे लावा झाडे जगवा ही मोहीम असेल या सर्व योजना महाविद्यालयीन पातळीवर या गावांमध्ये आपण राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी महाविद्यालयातील रासेयो शिबिरार्थी पुढील सात दिवस स्वच्छतेच्या बाबतीत आणि कार्यक्रमाधिकाऱ्यांनी सांगितलेल्या सूचनांचे पालन करून विविध प्रकारचे कार्य करतील. यासोबतच दुपारच्या बौद्धिक सत्रांमध्ये वेगवेगळ्या मान्यवर व्याख्यात्यांच्या व्याख्यानांमधून बौद्धिक्य वाढविण्याचा विद्यार्थी प्रयत्न करतील अशी मला आशा आहे. तेव्हा शारीरिक श्रम आणि बौद्धिक श्रम या दोघांच्या संमिलनातून उद्याचा सशक्त भारत आपण घडवूया. असे भावपूर्ण उद्गार डॉ रामेश्वर पवार यांनी याप्रसंगी काढले.

या विशेष सात दिवसीय शिबिराचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. मारुती तेगमपुरे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी पुढील सात दिवस शिबिरार्थी काय काय करतील त्यांचा दैनंदिन उपक्रम कसा असेल याबद्दलची सविस्तर माहिती याप्रसंगी त्यांनी दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. पुरुषोत्तम जुन्ने यांनी केले तर डॉ. दिलीप फोके यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाबासाहेब पवार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अशोक जाधव, उपसरपंच प्रशांत पवार आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि शिबिरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मागास आयोगातर्फे सुरू असलेल्या सर्वेमध्ये बौद्ध ऑप्शन देण्यात यावे

## समाज बांधवांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन !

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** राज्यामध्ये 23 जानेवारीपासून मागास आयोगातर्फे सर्वे सुरू असून अनेक शिक्षक शिक्षिका विविध प्रशासकीय खात्यातील कर्मचारी हे प्रत्येक गावामध्ये जाऊन शहरात वाड्यावर खेडेगावांमध्ये हातात मोबाईल घेऊन सर्वे करीत आहे. परंतु या सर्वे करत असताना मोबाईल ॲप मध्ये महार हे ऑप्शन देण्यात आल्यामुळे बौद्ध समाज संभ्रमात पडला असून, पूर्वश्रमीचे महार हे आताचे बौद्ध आहेत, त्यामुळे मोबाईल ॲप मध्ये बौद्ध ऑप्शन देण्यात यावे अशी मागण्याची बुलढाणा जिल्हाधिकारी यांना दि . २५ जानेवारी रोजी दिलेल्या निवेदनात बुलढाणा येथील बौद्ध समाज बांधवांनी केली आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की मराठा समाजाला आरक्षण देण्या साठी मागास आयोगातर्फे सर्वे सुरू असून यामध्ये आरक्षणाला कुठलाही विरोध नाही,मागासवर्गीय आयोग तथा बौद्ध धर्म यांचा दूरदूर चा संबंध नसून सर्वे जातीनिहाय नाही, १४ ऑक्टों . १९५६ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी



नागपूर येथे लाखो अनुयायासोबत बौद्ध धम्माची दीक्षा देत त्यानंतर पूर्वीचे महार हे आता बौद्ध धर्मीय झाली आहे, त्यामुळे बौद्ध धर्मीयांचा आकडा मुद्दाम कमी दाखवण्यासाठी मोबाईल ॲप मध्ये बौद्ध ऑप्शन न टाकता महार ऑप्शन टाकण्यात आल्याचेही स्पष्ट दिसत आहे ,देशात बुद्धांची संख्या येतो पुरस्कर अतिशय कमी दाखवल्या जाते ही शोकांतिका आहे मोबाईल ॲप मध्ये बौद्ध हे ऑप्शन नसल्याकारणाने सर्वे करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बौद्ध परिसरात सर्वेसाठी गेले असता एक तर बौद्ध असे लिहिण्याच्या आदेश देण्यात यावे अथवा मागासवर्गीय आयोगाचा सर्वे असल्यामुळे इतर मागास प्रवर्गाचा सर्वे करण्याचे आदेश देण्यात यावे,त्यामुळे बौद्ध धर्मीयांमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम निर्माण झाली आहे त्यामुळे जातीनिहाय सर्वे नसल्यामुळे त्याचा मागास आयोगाचा सर्वे असल्यामुळे मोबाईल ॲप मध्ये बौद्ध ऑप्शन टाकावे अशी मागणी सुद्धा दिलेल्या निवेदनात केली आहे, कर्मचाऱ्यांना इतर मागासवर्गात येणाऱ्या समाजाचा सर्वे करण्याचे आदेश देण्यात यावे असे न झाल्यास आम्हाला सरकार विरोधात न्यायालयात दाद मागावी लागेल असा इशारा सुद्धा निवेदनात दिला आहे. या निवेदनावर सम्राटचे संस्थापक अध्यक्ष आशिष पुरुषोत्तम खरात,उदय अमोल सुरडकर, राजेश गवई, गजानन ससाने, विरेन बोर्डे, रविकिरण मोरे, अनंथा मिसाळ यांच्या सह्या आहेत.

# आ. डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या शिंदी येथे भेटी!

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** सिंदखेडराजा मतदारसंघाचे आमदार तथा मंत्री डॉ. राजेंद्रजी शिंगणे यांनी दि. २५ जानेवारी रोजी शिंदी येथे निधन झालेल्या कुटुंबियांच्या घरी सांत्वन पर भेटी दिल्या,

शिंदी येथील पत्रकार सचिन खंडारे यांचे वडील सामाजिक कार्यकर्ते मधुकर खंडारे यांचे नुकतेच दहा जानेवारीला दुःखद निधन झाले होते. आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी मयत मधुकर खंडारे यांच्या घरी जाऊन सांत्वन पर भेट दिली व कुटुंबियांना धीर दिला. जुन्या आठवणींना उजाळा दिला मोठे साहेब स्वर्गीय भास्करराव शिंगणे व स्व. मधुकरराव खंडारे यांचा जवळचे संबंध होतेण्या वेळी शिंगणे यांनी मधुकरराव खंडारे धडपडीचे कार्यकर्ते होते, असे सांगितले. त्यानंतर त्यांनी प्रकाश बंगाळे यांच्या घरी सुद्धा सांत्वन पर भेट दिली.

त्यांच्या समवेत राष्ट्रवादीचे गटनेते रामभाऊ जाधव,सिद्धेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पंजाबराव हाडे, माजी प्राचार्य संतोष दसरे ,दादाराव बंगाळे, भगवान पाटिल, मंगेश बंगाळे, शोमेश इंगळे, निवृत्ती बंगाळे , सुनिल खंडारे, उपस्थित होते.



# निलंबीत पोलीस कर्मचाऱ्याच्या गाडीने पदचाऱ्याला दिली धडक

## धडकने ६५ वर्षीय इसम गंभीर जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार पोलीस ठाण्याचे निलंबीत पोलीस कर्मचारी रविंद्र देशमुख हे सिल्लोड - फुलंब्री महामार्गावर नायगव्हान येथे प्रवास करत असतानां एका ६५ वर्षीय वृद्ध इसमास कारने ठोकरल्याने तो इसम गंभीर जखमी झाला असून त्यास घाटी रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. जळगाव - छत्रपतीसंभाजीनगर राष्ट्रीय महामार्गवर २५ जानेवारी रोजी ५ वाजेच्या सुमारास नायगव्हान ता फुलंब्री येथे स्वीफट कार क्र एम एच २० डि जे २५५९ या क्रमांकाच्या कार ने नायगव्हाण येथील ६५ वर्षीय इसम नामे दिनकर पुडलिक सनान्से रा नायगव्हाण ता फुलंब्री यांना जोराची धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले . त्यांना उपचारासाठी तातडीने उपचार कामी घाटी रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे दाखल केले आहे . प्रत्यक्षदर्शी ने दिलेल्या माहितीवरून सदरील स्वीफ्ट कार हि वडोदबाजार येथील पंधरा दिवसा पूर्वी निलंबीत झालेल्या रविंद्र देशमूख यांची असल्याचे व ते स्वतहा गाडी चालवत असल्याचे सांगण्यात येत आहे . या बाबत घाटी रुग्णाल्यातील पोलीस चौकीतून वडोदबाजार पोलीसांना अपघाताची खबर पाठवण्यात आली आहे. सदरील निलंबीत पोलीसा बाबत परीसरात उलट सुलट चर्चेला उधाण आले असून त्या कर्मचाऱ्यांस पोलिस पाठीशी घालणार तर नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# भाजपाचे कार्य देशाभिमानाचे : खा. प्रताप चिखलीकर

## भोकरला नवमतदार संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** देशात भाजप सरकार सत्तेवर आल्यापासून आज पर्यंत जनहिताचे निर्णय घेवून वेगळी ओळख निर्माण केली आहे. बहूमताच सरकार काय करू शकते हे पंतप्रधान मोदी यांनी दाखवून दिले आहे. भाजपचे कार्य हे देशाभिमानाचे आहे असे प्रतिपादन खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी गुरुवारी (ता.२५) केले आहे. शहरातील माऊली मंगल कार्यालयात नमो नवमतदाता संमेलन घेण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर खासदार प्रताप पाटील चिखलीकर, नवनिर्वाचित जिल्हा अध्यक्ष किशोर देशमुख, विधानसभा संयोजक श्रीकांत किन्हाळकर, यूवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष गणपत पीठ्ठेवाड, सुभाष किन्हाळकर, माऊली चिंचाळकर, विजयाताई घिसेवाड, सुनिता राचूटकर यांची उपस्थिती होती. चिखलीकर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील अनेक लोकहिताचे निर्णय घेवून जनतेची मने जिंकली आहेत. विशेषता युवकांसाठी अनेक रोजगार उपलब्ध करून दिले आहेत.आता देशातील नवमतदारांना त्याच्या जाणीवा समृद्ध करण्यासाठी महत्वाचे पाऊल उचलले आहे. येणाऱ्या काळात भारत देश हा सर्व श्रेष्ठ देश म्हणून गणल्या जाईल अशी आखणी केली आहे. ही बाब आपल्यासाठी गौरवशाली असेल यात दुमत नाही असे सांगितले आहे.येथील विधानसभा संयोजक श्रीकांत किन्हाळकर यांनी शहरात नवमतदार जागृती संदर्भात चांगलं नियोजन करून पक्षाला ऊभारी देण्याच काम केल आहे, असे मत चिखलीकर यांनी व्यक्त केले आहे.





# रेलगाव येथे अश्वारूढ शिवस्मारकाचा उद्घाटन सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील रेलगाव येथे आश्वरुड शिवस्मारकाचे उद्घघाटन सोहळा वाणेगाव रेलगाव ग्रुप ग्रामपंचायत चे सरपंच ज्ञानेश्वर भाऊ जाधव यांच्या हस्ते पार पडला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती फुलंब्रीचे माजी सभापती सुभाष अण्णा गायकवाड, शिवस्मारक समिती रेलगावचे अध्यक्ष श्री गणेश क्षीरसागर वानेगाव रेलगावचे उपसरपंच संतोष तुपे, पोलिस पाटील भास्कर क्षीरसागर सामाजिक कार्यकर्ते विनोद कसारे, ग्रामपंचायत सदस्य गणपत क्षीरसागर, किशोर कदम ग्रामस्थ सर्जेराव कदम, रामेश्वर कदम, शिवाजी क्षीरसागर, लक्ष्मण क्षीरसागर, गोपीनाथ भालेराव,सुरेश क्षीरसागर, प्रवीण साळवे व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युवासेना शहरप्रमुखाची धारदार चाकूने हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** गणतंत्र दिवसाच्या पूर्व संध्येला उद्धव ठाकरे शिवसेना गटाचे युवासेना शहरप्रमुख शिवा वझरकर (३०) याची गुरुवार २५ जानेवारीच्या रात्री ९.३० वाजताच्या सुमारास धारदार शस्त्राने हत्या करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या हत्याकांडामुळे शहरात तणावाचे वातावरण आहे. याप्रकरणात पोलिसांनी राजकीय पक्षातील माजी पदाधिकारी व सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलाला अटक केली आहे. गुरुवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास शिवा वझरकर सरकार नगर येथे अग्रवाल कोचिंग क्लासेसजवळ एकाला भेटायला गेले होते. तिथे दोघांमध्ये चर्चा सुरू असताना आरोपी घटनास्थळी आला व शिवा वझरकर यांच्यावर चाकूने सपासप वार केले. यात वझरकर गंभीर जखमी झाला. त्याला गंभीर अवस्थेत एका खासगी रुग्णालयात आणण्यात आले. उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरने मृत घोषित केले.

# विकसित देशासाठी विकसित गाव गरजेचे : हरिभाऊ बागडे

## १ कोटी ६३ लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मौजे भालगाव ता.फुलंब्री जी. छ.संभाजीनगर येथील १ कोटी ६३ लक्ष रुपयाच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन/ लोकार्पण आमदार माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे नाना यांच्या शुभहस्ते संपन्न झाले,मतदार संघातील प्रत्येक गाव सर्वांगीण विकसित गाव म्हणून कसे ओळखले जाईल या साठी आपण नियमित प्रयत्न शिल असणे गरजेचे असल्याचे प्रतीपादन त्यांनी यावेळी बोलून दाखवले,कारण विकसित भारताचे स्वप्न विकसित गावातून पूर्ण होणार आहे, त्या दृष्टीने माझ्या फुलंब्री विधानसभा मतदार संघातील प्रत्येक गाव विकसित गाव करण्यासाठी सर्वोतपरी प्रयत्न चालू असल्याचेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी भाजप जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजीराव पाथ्रीकर, माजी सभापती सर्जेराव पाटील मेटे, माजी उपसभापती कडूबा म्हस्के, माजी जिल्हा परिषद सदस्य इंदुताई वाघ, वडोद बाजार च्या सरपंच पकिजा पठाण, उपसरपंच गोपाल वाघ, ग्रामपंचायत सदस्य शीलाताई शिंनगारे, स्वाती वायकोस जैन, सोमनाथ कोलते, गणेश कोलते, डॉक्टर रावसाहेब कोलते, शेनफड कोलते, काकाजी कोलते, बूथप्रमुख सुरेंद्र कोलते,मयुर कोलते, रामदास कोलते, पांडू कोलते, यांच्यासह मोठ्या प्रमाणावर गावकरी व पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.



# पहिल्याच दिवशी सर्वेक्षणात तांत्रिक अडचणी; स्लोनेट स्लोवर्क माहितीतही अडचण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** मराठा समाजाच्या आरक्षणासाठी खुल्या प्रवर्गातील सर्वेक्षणाला दि.२४ बुधवारपासून खुलताबाद तालुक्यात सरुवात झाली आहे त्यात पहिल्याच दिवशीच तालुक्यात ठिकठिकाणी तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने प्रगणकांचा खोळंबा झाला तर स्लो नेट स्लो वर्क माहितीतही अनंत अडचणी त्यामुळे प्रगणक व माहितीदार यांचा खुप वेळ वाया गेला मात्र दुसऱ्या दिवशी सर्वेक्षण सुरळीतपणे सुरू झाले. मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्यमागासवर्ग आयोगाच्या वतीने खुल्या प्रवर्गातील सर्वेक्षणाला सुरुवात झाली आहे. गोखले इन्स्टिट्यूट पुणे च्या माध्यमातून सर्वेक्षण ॲप तयार केलेल्या मोबाईल ॲपच्या माध्यमांतून मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील कुटुंबा चे सामाजिक आर्थिक व जातीनिहाय आरक्षण दि.३१जानेवारी पर्यंत करण्याचें आदेश राज्य शासनाकडून दिले आहेत तर १५४ते१८२प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्यात आली आहे.त्यामाध्यमातुन सर्वेक्षणला सुरुवात झाली आहे.त्यात स्लो नेट स्लो वर्क माहितीतही अनंत



अडचणी लॉगीन होत नाही प्रश्नाची उत्तरे सबमिट करण्यात ही तांत्रीक अडचणींनीनां समोरे जावे लागत आहे.सर्वेक्षणसाठी ग्रामसेवक शिक्षक कृषीसेवक तलाठी यांचा समावेश आहे.तर मा तहसीलदार स्वरुप कंकाळ यांनी ठिकठिकाणी सर्वेक्षण होत असलेल्या गावांना भेटी दिल्या. सर्वेक्षणकामासाठी १५पर्यवेक्षक, २५१प्रगणकांची नेमणूक करण्यात आली आहे.



# ओव्हरफ्लो पाण्याचा फटका, शालेय विद्यार्थी-शिक्षकांना होतो त्रास

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे बोडखा- गंधेश्वर ग्रामपंचायत अंतर्गत पाणी पुरवठा टाकीत पाणी साठा पुर्ण होवून शाळा परिसर प्रगंणात पाणी पसरल्याने सकाळी विद्यार्थी शिक्षक यांना येजा मोठी आटापीटा करावी लागली दुसरीकडून रस्ता करून शाळा गाठावी लागली. सद्या गंधेश्वर प्रकल्पात मोठा पाणी साठा असल्याने याची किंमत राहीली नाही. बोडखा-गंधेश्वर ग्रामपंचायत अंतर्गत गाव पाणी पुरवठा साठी पाण्याच्या टाकीत पाणी घेताना पाण्याची टाकी फुल भरली की नाही हे पाहण्याचा विसर पडल्याने पाणी टाकी फुल होवुन शेंकडों लिटर पाणी वाया जावून लगतच उर्दू शाळेच्या आवारात प्रगणात तुंबले सकाळी शाळेत जाण्यासाठीचा रस्ताच पाण्या खाली गेले सकाळी लहान लहान मुले विद्यार्थी शिक्षक शाळा शिक्षणासाठी आले तेंव्हा शाळाप्रगणाला तलावाचे स्वरूप आले होते रस्ता नसल्याने असेतसे करुन वाट काढावी लागली.तर येथे ग्रामसेवक नसणे नवीन नाही हे पदाधिकारी व नागरिक जाणुन आहेच तर यांच्यावर वचक ठेवणारे विस्तार अधिकारी गटविकास अधिकारी यांनाही याची कल्पना असल्याने सर्व आलबेल सुरू आहे हे विशेष.

# मंत्री छगन भुजबळ यांना ध्वजारोहणाचा मान नाही

## विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची सरकारवर खरमरीत टीका



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यासाठी राज्य शासनाने पालकमंत्री, मंत्री यांच्या नावाचे संबंधित जिल्ह्यांच्या नावासह परिपत्रक काढले आहे. यामध्ये मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांचे नाव नाही. दोन वेळा उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी सांभाळलेल्या ज्येष्ठ ओबीसी मंत्र्याला महायुतीचे सरकार ध्वजारोहणाचा मान देत नाही. महायुती सरकारकडून ओबीसी मंत्र्याची अवहेलना केली जात आहे. अशी खरमरीत टीका विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर केली आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांचे बळ कमी झालं कि, कमी केलं जातंय असा प्रश्न पडतो आहे. भाजपमध्ये ओबीसी नेत्यांना दिलेली वागणूक स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या काळापासून राज्यातील जनतेला माहित आहे. त्यामुळे मंत्री भुजबळ यांना डावलने हे काही नवीन नाही. या सरकारमध्ये ओबीसी नेत्यांचा वाटेला अशीच वागणूक येणार हे आधीपासूनच स्पष्ट होते. ओबीसी मंत्री छगन भुजबळांचे सरकार मधील बळ किती आहे, हे आज राज्यातील जनतेला महायुती सरकारने दाखवून दिले आहे. त्यामुळे सरकारचे ओबीसी प्रेम हे ढोंगी आहे. हे यावरून स्पष्ट होते, असे खडेबोल श्री. वडेट्टीवार यांनी सरकारला सुनावले आहेत.

# मतदान करणे गरज नसून प्रत्येकाचे कर्तव्ये : प्रा. प्रवीण सरकटे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जय कालंका देवी शिक्षण संस्था संचलित शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व कै लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील कला वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय सावळदबारा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आज राष्ट्रीय मतदान दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष भाऊराव लक्ष्मणराव कोलते हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते तर करा मग कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य नारायण कोलते यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत करून राष्ट्रीय मतदान दिन साजरा केला याप्रसंगी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक प्रवीण सरकटे यांनी मतदान युवकांच्या आयुष्यात का महत्वाचे आहे याबद्दल सखोल मार्गदर्शन केले आपल्या देशातील लोकशाही संपूर्ण जगात भक्कम व यशस्वी असल्याचे भारत निवडणूक आयोगाने सर्व जगाला दाखवून दिलेले आहे. अशा या भारत निवडणूक आयोगाची स्थापना 25 जानेवारी 1950 रोजी झाल्याने हा दिवस देशभर राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जात आहे. मतदानाविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने सर्व जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. मतदार हा राजा आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदारांनी निवडणूकीत मतदानाचा पवित्र हक्क बजावला पाहिजे. हे या राष्ट्रीय मतदार दिवसाने अधोरेखित केलेले आहे. नवीन मतदारांमध्ये जागृतीसाठी हा दिवस साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने जिल्हयात विविध स्पर्धा, जनजागृतीचे कार्यक्रम ही शालेय, महाविद्यालयीन पातळीवर आयोजित केलेले आहेत. गांव, तालुका व जिल्हास्तरावरही भारत निवडणूक आयोगाच्याह निद्देशानुसार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.इत्यादींच्या माध्यमातून मतदार नोंदणीचे महत्व प्रा.सरकटे यांनी युवकांना पटवून सांगितले.याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक विकास पाटील, विजय सिंग राजपूत, भास्कर ससाणे, संजय जोशी,भास्कर खमाट, मुकुंद व्यवहारे, सुदाम राठोड ज्ञानेश्वर राठोड पोपटराव सोनवणे, भूषण देसले, प्रा.जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते,शाम जाधव, अजबराव चव्हाण, बाबासाहेब कोलते, राहुल बडक, गणेश मोहने, गणेश सत्रे, जयराम घोती,सतीश खवले, पंजाबराव शेळके, योगेश थोटे, सतीश गावंडे, जयराम घोती,मनोहर पडोळ, संजय अमृतकर,शिवाजी सत्रे, इत्यादी प्राध्यापक व शिक्षक उपस्थित होते तर सर्व विद्यार्थी व पालक पत्रकार बंधू उपसंपादक गोकुळसिंग राजपूत, रहीम पठाण, सुनील चोरमले, जब्बार एस तडवी सर्व पालकांचे शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे आभार प्रा जीवन कोलते पा.यांनी मानले.





# मोरखेड्यात मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा अंतर्गत मोफत दिनदर्शिका वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथे दि.२५/१/२४ रोजी मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा अंतर्गत मुख्य संपादक रवींद्र बांगड यांचे दैनिक आनंद नगरी दिनदर्शिकाचे उपसंपादक गोकुळसिंग राजपूत तथा जेष्ठ पत्रकार यांच्या हस्ते जिल्हा परिषद प्राथमिक मोलगेडा शाळेत शिक्षकवृंद यांना दै आनंद नगरीं दिनदर्शिकाचें वाटप करण्यात आले.आणि विद्यार्थ्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देऊन "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत दैनिक आनंद नगरीचे दिनदर्शिका वाटप केल्या. हा कार्यक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक अवधूत सर, सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारंगणे व ग्रामपंचायत सदस्य अतुल इंगळे यांनी पत्रकार यांच्याशी बोलताना दैनिक आनंद नगरी व परिवार नेहमी शैक्षणिक राजकीय सामाजिक व ग्रामीण भागातील बातम्या प्रसारित करून न्याय देत असतात त्यामुळे त्यांचे आभार मानले याप्रसंगी संदीप कळसकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. बाजुळंगे सर मनोगत व्यक्त केले. दिनदर्शिकेचे महत्त्व विशद केले व शाळेत मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने करा, हा महत्त्वाचा संदेश दिला.केंद्रीय प्रमुख एस बी राठोड मॅडम यांनीही मुलांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या आनंदा वारांगणे कवी यांनी केले.याप्रसंगी शाळेत सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारंगणे, केंद्रीय प्रमुख एस बी राठोड मॅडम, अतुल इंगळे, भूषण पवार, मुख्याध्यापक अवधूत सर,बाजुळगे सर, चौधरी सर, संदीप कळसकर, आनंदा वारांगणे, व शिक्षकवृंद, दैनिक आनंद नगरीचे दिनदर्शिका वाटतप करताना उपस्थित होते. आभार आनंदा वारांगणे कवी यांनी मानले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर